दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१०१ | गुरूवार दि.०१ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

नाव नीती पण कारभार अनितीचा

स्वातंत्र्यानंतर भारताच्या समतोल विकासासाठी व त्या नियोजनासाठी स्वतंत्र व निरपेक्ष व्यवस्था असावी म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी नियोजन आयोगाची स्थापना केली होती. अनेक तज्ज्ञांना या आयोगात पाचारण करून देश आर्थिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या, वैज्ञानिकदृष्ट्या, तांत्रिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या कसा आत्मनिर्भर होईल यासाठी या आयोगाने महत्त्वपूर्ण भूमिका वठवावी असेच अपेक्षित होते. त्यात नियोजन आयोग बऱ्याच प्रमाणात यशस्वी ठरला आणि त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारताने वेगाने प्रगती केली.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी प्रीती सुदान

नवी दिल्लीः माजी केंद्रीय आरोग्य सचिव आणि १९८३ बॅचच्या आयएएस अधिकारी प्रीती सुदान यांची यूपीएससीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मनोज सोनी यांनी आयोगाच्या अध्यक्षाचा राजीनामा दिल्याने अध्यक्षपद रिक्त झाले होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाने बुधवारी आयएएस अधिकारी प्रीती सुदान यांची नवीन अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. प्रीती सुदान गुरूवारी पदभार स्वीकारणार आहेत. सुदान कर्नाटक केडरच्या १९८३ बॅचच्या आयएएस अधिकारी असून, त्यांचा कार्यकाळ एप्रिल २०२५ पर्यंत असेल. त्यांनी केंद्रीय अन्न सचिव म्हणूनही काम केले आहे. यूपीएससीच्या प्रमुख बनणाऱ्या सुदान या दुसऱ्या महिला आहेत.

राज्यात १ कोटी ६४ लाख शेतकऱ्यांनी भरला पीकविमा

धनंजय मुंडे यांच्याकडून रुग्णालयातून कृषी खात्याचा आढावा

मुंबई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत एक रुपयात पीक विमा ही संकल्पना राबविणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून, खरीप २०२४ हंगामात ३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत १ कोटी ६३ लाख ६० हजार पेक्षा अधिक पीकविमा अर्ज दाखल करण्यात आले असून, लाखो शेतकऱ्यांनी एक रुपया विमा सहभाग भरून पिकविमा योजनेत याही वर्षी सहभाग घेतला आहे. बुधवार ३१ जुलै हा विमा भरण्यासाठी अखेरचा दिवस असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी आपला विमा तात्काळ भरून घ्यावा व आपले पीक विमा संरक्षित करावे असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले होते. विशेष म्हणजे मागील २४ तासात राज्यभरातून तब्बल ५ लाख ७४ हजार शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरला आहे.

धनंजय मुंडे यांच्यावर शुक्रवारी

(ता.२७) मुंबईतील सर एच.एन.रिलायन्स फाऊंडेशन रुग्णालयात पित्ताशयाची शस्त्रक्रिया करण्यात आली असून ते पुढील उपचार घेत आहेत. दरम्यान रुग्णालयातूनही त्यांच्याकडून कृषी विभागाचा आढावा घेणे सुरूच आहे. पीक विम्यासह विविध योजनांचा आढावा ते सातत्याने घेत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना ७.५ हॉर्स पावर पर्यंतच्या कृषी वीज पंपांना पूर्णपणे मोफत वीज देण्याचा निर्णय झाला. त्यानंतर काही दिवसातच ◀◀ पान २ वर

महाराष्ट्रात सर्वाधिक पीकविमा

खरीप २०२३ मध्ये एक रुपयात पीकविमा ही योजना प्रथमच अंमलात आली होती. त्यानंतर खरिपात राज्यात बहुतांश भागात दुष्काळसदृश परिस्थिती व हवामानातील असमतोल यामुळे झालेल्या नुकसानीच्या पोटी विमा धारक शेतकऱ्यांना आतापर्यंत अग्रीम, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात व पीक कापणी प्रयोगानंतर असे मिळून आतापर्यंत एकूण ७२८० कोटी रुपये इतका पीकविमा मंजूर करण्यात आला असून यांपैकी ४२७१ कोटी रुपयांची वितरण प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तर ३००९ कोटी रुपये विमा रक्कम वितरण सुरू आहे. तसेच पीक कापणीचे अंतिम अहवाल निश्चितीनुसार या रक्कमेत आणखी वाढ होणार आहे.

प्रलंबित विमा अन् बैठकांचे सत्र

२०२० पासून ते आतापर्यंत काही स्थानिक अडचणी, तांत्रिक अडचणी, विमा कंपन्यांच्या नियमांची आडकाठी, लॉकडाऊन काळातील समस्या यांसारख्या अडचणींमुळे बीड, बुलढाणा, धाराशिव, अकोला, रायगड, अहमदनगर अशा काही जिल्ह्यातील काही विमा प्रकरणे प्रलंबित आहेत. यातील काही प्रकरणे राज्य शासन व केंद्र शासन तसेच काही प्रकरणे न्यायालय स्तरावर सुनावणीत आहेत. या सर्वच प्रकरणांची कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी वेळोवेळी दखल घेऊन त्याबाबत जिल्हानिहाय, प्रकरण किंवा कंपनी निहाय बैठकांचे सत्र आयोजित करून ती प्रकरणे निकाली काढून शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. याद्वारे रायगड, धाराशिव, बीड आदी जिल्ह्यातील काही प्रकरणे निकाली निघाली असून उर्वरित प्रकरणे निकाली निघून शेतकऱ्यांना लाभ मिळेल असे नियोजन करण्यात येत आहे.

राज्यात दुधाचा दर निश्चित!

ठरवून दिलेला दर न दिल्यास, अन् भेसळ आढळल्यास थेट गुन्हा

अहमदनगर । पतिनिधी

राज्यातील दूध उत्पादन शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्यातील दुध संकलन केंद्रांमध्ये दुधाचा दर निश्चित करण्यात आला आहे. राज्य सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर ३० रुपये दर आणि ५ रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दुध संकलन केंद्रांना शेतकऱ्यांच्या दुधाला प्रती लीटर ठरवून दिलेला देणे बंधनकारक करण्यात आल्याची माहिती, राज्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखें पाटील यांनी दिली आहे.

दुधाला ठरवून दिलेला दर न देणाऱ्या दूध संकलन केंद्रावर थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली आहे. सोबतच दूध भेसळीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात समिती स्थापन करण्यात आली असून, ज्या ठिकाणी दूध भेसळ आढळेल तेथे थेट गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देखील देण्यात आल्याची माहिती राधाकृष्ण विखे यांनी दिली आहे. ते अहमदनगर येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. ◀◀ पान २ वर

दुध, दुग्धजन्य पदार्थात भेसळ करणाऱ्या विरोधात एमपीडीए

राज्य सरकार दुधात भेसळ करणाऱ्या विरोधात कारवाईसाठी भक्कम कायदा तयार करण्याच्या तयारीत आहे. दुध आणि दुग्धजन्य पदार्थात भेसळ करणाऱ्या विरोधात एमपीडीए लावला जाईल, अशी माहिती राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी एबीपी माझा शी बोलताना दिली आहे. एवढेच नाही तर दूध आणि दुग्धजन्य पदार्थात भेसळ करणाऱ्यांना जामीन मिळूच नये, अशी कठोर तरतूद राज्य सरकार त्या कायद्यात करणार आहे. या प्रस्तावित कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागासोबत डेयरी विभागाचे आणि पोलीस दलाचे अधिकारी संयुक्त पथकांमध्ये सहभागी केले जातील, असेही आत्राम म्हणाले.

महाराष्ट्रात ईडी पुन्हा सक्रिय

मनी लाँड्रींगप्रकरणी पुणे, बारामतीसह मुंबईतील कंपन्यांत सर्च ऑपरेशन

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकांपूर्वी काही दिवस अगोदर कमी झालेल्या ईडीच्या धाडी पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत आहे. ईडीने मनी लाँड्रींगप्रकरणी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी धाडी टाकल्या आहेत. मुंबई, कर्जत, बारामती आणि पुण्यातही धाड टाकण्यात आल्याची माहिती आहे. ईडीकडून मनी लाँड्रींग प्रकरणी पुण्याच्या एम. एस. शिव पार्वती साखर कारखाना आणि इतर कंपन्यांच्या खात्यात पैशांचा गैरव्यवहार झाल्याच्या आरोपाखाली सर्च ऑपरेशन राबवण्यात आले. एम/एस. हायटेक इंजीनियरिंग कॉर्पोरेशन इंडिया प्रा.लि. आणि त्यांचे व्यवस्थापक नंदकुमार तासगांवकर, संजय आवटे आणि राजेंद्र इंगवाले यांच्या बँक लोन फसवणूकप्रकरणी हे अभियान राबवण्यात आले आहे. ईडीच्या या छापेमारीत अनेक संशयास्पद कागदपत्र डिजिटल ◀◀ पान २ वर

युपीएससी परीक्षेसाठी पूजा खेडकर यांना नो एन्ट्री

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्रीय लोकसेवा आयोगाने बुधवारी प्रशिक्षणार्थी वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांची उमेदवारी तात्पुरती रद्द केली. पूजा खेडकर यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे केंद्रीय लोकसेवा आयोगाला आढळून आले. यामुळे त्यांना भविष्यातील सर्व परीक्षा आणि निवडीतून प्रतिबंधित करण्यात आले आहे.

यूपीएससीने उपलब्ध नोंदी काळजीपूर्वक तपासल्या असून सीएसई – २०२२ नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल पूजा खेडकर दोषी आढळल्या आहेत. यामुळे नागरी सेवा परीक्षा (–२०२२) साठी त्यांची तात्पुरती उमेदवारी रद्द करण्यात आली आहे आणि त्यांना युपीएससीच्या भविष्यातील सर्व परीक्षा, निवड यापासून कायमचे प्रतिबंधित करण्यात ◀◀ पान २ वर

पोस्टाच्या पार्सलद्वारे शहरात आलेल्या २२ तलवारी केल्या जप्त

स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, २ सख्खे भाऊ अटक

जालना। प्रतिनिधी

पोस्टाच्या पार्सलव्दारे जालना शहरात आलेल्या २२ तलवारी स्थागुशा पोलिसांनी जप्त केल्या आहेत. याप्रकरणी पोलिसांनी आदित्य राजु काटकर व मंगेश राजु काटकर रा. लोधी मोहल्ला जालना या भावंडांना अटक करण्यात आली आहे.

वरिल विषयी वृत्त असे की, ३१ जुलै २०२४ रोजी जालना जिल्ह्यातील अवैध शस्त्रे बाळगणार्या आरोपींची माहीती घेऊन त्यांचा शोध घेणेबाबत विशेष मोहीम राबविण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक डॉ. अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांचे सुचनेवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळी पथके तयार करुन जालना जिल्हा हद्दीतील अवैध शस्त्रे बाळगणार्या आरोपींची माहीती घेऊन शोध घेत असतांना खबर्यामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली ◀◀ पान २ वर

मराठ्यांच्या मुलांना संपविण्याचे सरकारचे षढयंत्र

ईडब्ल्यूएस आरक्षणावरून मनोज जरांगे यांचा राज्य सरकारवर आरोप

जालना। प्रतिनिधी

पोलीस भरती ईडब्लूएस बाबतचा विषय सध्या सुरू आहे. आम्ही हे आरक्षण रद्द करू नका, असे म्हणालो होतो. एसईबीसी दिले तर ठेवा. पण ईडब्लूएस रद्द करू नका, असे मी म्हणालो होतो. परंतु, आम्ही न मागितलेले एसईबीसी आरक्षण देऊन ईडब्ल्यूएस रद्द करून मराठ्यांच्या मुलांना संपविण्याचे हे सरकारचे षढयंत्र आहे, असा आरोप मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे–पाटील यांनी बुधवारी (दि.३१) केला. ते अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलत होते. याबाबत मंत्री शंभुराज देसाई यांच्याशी चर्चा झाली आहे.

त्यांनी आम्ही तातडीने लक्ष घालून मुख्यमंत्र्यांना भेटतो, असे सांगितले आहे. असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, मुलींना मोफत शिक्षण मिळत नाही, हे सत्य आहे. गरिबांच्या मुलींना फसवू नका. अजूनही फी घेतली जात आहे. एसईबीसीमधून अर्ज भरलेल्या मुलांचे देखील वाटोळे करू नका. शिंदे समितीला मुदतवाढ देण्याच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बंगल्यासमोर आंदोलन सुरू आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरून १२–१३ संघटना प्रवीण दरेकर यांनी गोळा केल्या आहेत. त्यांना मराठा समाजाचा वापर करून ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३१ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू : ३.०० क्विंटल			
किमान	कमाल	सरासरी	
२,६५१	२,७११	२,६८१	
ज्वारी/हायब्रिड :९५.५० क्विंटल			
२,१००	२,८९१	२,४०६	
मूग :१४.५० क्विंटल			
१,९५०	३,०४१	२,४५५	
तूर : ४.०० क्विंटल			
७,०००	९,७००	८,०५०	
उडीद : २.५० क्विंटल			
४,९०१	७,४००	६,१५०	
बाजरी: ३५.०० क्विंटल			
२,५००	३,६७१	२,७१५४	
चिंच/लोकल: २०.०० क्विंटल			
१,१००	३,५५०	२,३२५	
सोयाबीन: १३.०० क्विंटल			
४,२६०	४,३००	४,२८०	
हरभरा: ७.०० क्विंटल			
६,४५०	६,४५०	६,४५०	

राज्यातील मोटार निर्मिती उद्योगात क्रांती येणार!

छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्करसमवेत सामंजस्य करार

मुंबई । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पामुळे मराठवाड्याला मोठा फायदा तर होईलच शिवाय एकूणच भारतातील मोटार वाहन निर्मिती उद्योगात देखील एक क्रांती येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. बुधवारी सह्याद्री अतिथिगृह येथे राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्कर यांच्यात छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्स निर्मितीच्या ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते .

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, किर्लोस्कर मोटर्सच्या उपाध्यक्ष मानसी टाटा, गीतांजली किर्लोस्कर, टाटा किर्लोस्करचे व्यवस्थापकीय संचालक मसाकाझु योशीमुरा, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे. एमआयडीसी सीईओ विपिन शर्मा आदि उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर येथे या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार आहे. यासाठी २० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार असून सुमारे ८ हजार थेट आणि अप्रत्यक्ष ८ हजार अशी १६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कार्सची निर्मिती होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी ८५० एकर जागा देण्यात आली आहे. टोयोटाच्या या प्रकल्पामुळे भारताच्या ई कार्स निर्मिती उद्योगात क्रांती येईल असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य शासन देखील ◀◀ पान २ वर

“ २० हजार कोटींची गुंतवणूक, १६ हजार रोजगार निर्मिती

छत्रपती संभाजीनगर येथे या प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार आहे. यासाठी २० हजार कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे. सुमारे ८ हजार थेट आणि अप्रत्यक्ष ८ हजार अशी १६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कार्सची निर्मिती होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी ८५० एकर जागा देण्यात आली आहे.

अग्रलेख

नाव नीती पण कारभार अनितीचा

स्वातंत्र्यानंतर भारताच्या समतोल विकासासाठी व त्या नियोजनासाठी स्वतंत्र व निरपेक्ष व्यवस्था असावी म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी नियोजन आयोगाची स्थापना केली होती. अनेक तज्ज्ञांना या आयोगात पाचारण करून देश आर्थिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या, वैज्ञानिकदृष्ट्या, तांत्रिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या कसा आत्मनिर्भर होईल यासाठी या आयोगाने महत्त्वपूर्ण भूमिका वठवावी असेच अपेक्षित होते. त्यात नियोजन आयोग बऱ्याच प्रमाणात यशस्वी ठरला आणि त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारताने वेगाने प्रगती केली. अर्थात भारतासारख्या खंडप्राय व वैविध्यता हीच ओळख असलेल्या देशात समतोल विकास साधून सर्व भागांच्या समस्या दूर करण्याबरोबरच त्या भागातील जनतेच्या आशा-अपेक्षांची पूर्तता करायची तर अशा आयोगाचे काम हे निरंतर सुरू ठेवावे लागते आणि त्यात सातत्य आणि निरपेक्षभाव कायम ठेवावा लागतो.

शिवाय काळानुरूप बदलत जाणाऱ्या गरजा व अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी आयोगाच्या कार्यपद्धतीतही आवश्यक बदल करावे लागतात. नरेंद्र मोदी केंद्रात सत्तेवर आल्यानंतर देशासमोरील उद्दिष्टांच्या अंमलबजावणीचे शिवधनुष्य नियोजन आयोगाला पेलवत नसल्याचे कारण देत त्यांनी हा आयोग बरखास्त केला व नीती आयोगाची स्थापना केली. या बदलास खरं तर काहीच हरकत असण्याचे कारण नाही. मात्र, आपल्या देशात अर्थकारणही राजकीय समीकरणांपासून अलिप्त ठेवण्याची कुणाचीच इच्छा नसल्याने हा बदलही राजकीय आखाडा तापविणाराच ठरला. मात्र, मोदींच्या पहिल्या दोन टर्ममध्ये त्यांच्या पक्षाकडे बहुमतही होते आणि देशातील जनमतही मोदींच्या पाठीशी होते. त्यामुळे विरोधकांचे आक्षेप व विरोध यांचा आवाज दुर्बलच होता. तिसऱ्या टर्ममध्ये मात्र देशातील राजकीय चित्र बऱ्यापैकी बदलले आहे. भाजपविरोधात एकत्र आलेल्या विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीकडे १० राज्यांची सत्ता आहे. त्यामुळे आता या नीती आयोगाचे कामकाज समन्वयाने व निरपेक्षपणे पार पडेल याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची सरकारची जबाबदारी आहे. मात्र, नुकत्याच झालेल्या नीती आयोगाच्या सातव्या वार्षिक बैठकीवर १० राज्यांच्या प्रमुखांनी सरकारवर पक्षपातीपणाचा आरोप करीत बहिष्कार घातला. देशातील ज्या राज्यांना केंद्रस्थानी ठेवून संपूर्ण देशाच्या प्रगतीचे व भविष्याचे नियोजन करायचे त्या राज्यांचे प्रतिनिधीच जर बैठकीला हजर राहू शकणार नसतील तर कुठला आयोग कसली नीती ठरवणार हा प्रश्नच आहे. संपूर्ण देशाचा समतोल व सर्वांगीण विकास साधायचा तर धोरण आखणी निरपेक्ष व राजकारणापासून अलिप्त ठेवायला हवी. दुर्दैवाने मागच्या काही काळापासून देशातील सर्वच राजकीय पक्षांनी हे भान बाळगण्यापासून फारकतच घेतली आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संवाद तर संपुष्टात आलाच आहे मात्र त्याची जागा आता विसंवादाने घेतली आहे. देशात मोदींना कडवे आव्हान देण्याची ताकद फक्त आपल्यातच असल्याची प्रतिमा निर्माण करण्याचा सदोदित खटाटोप करणाऱ्या ममता बॅनर्जी यांनी विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीलाही आपले वेगळे अस्तित्व दाखवून देण्यासाठी नीती आयोगाच्या बैठकीवरील बहिष्कारात सहभागी न होता बैठकीला हजेरी लावली खरी पण बैठकीत आपल्या राजकारणाचीच रेघ ठळक करत त्यांनी आपला माईक बंद केला जात असल्याचा व आपणास बोलू दिले जात नसल्याचा आरोप करीत सहाव्या मिनिटाला त्या बैठकीतून बाहेर पडल्या. आपल्या राज्यावर कसा अन्याय होतो आहे व राज्यातील जनतेच्या काय अपेक्षा आहेत हे ठासून सांगण्याची संधी त्यांनी आपल्या आवडत्या आक्रस्ताळेपणाच्या वर्तनातून गमावली. अशा आक्रस्ताळीपणास समोरून तेवढेच चोख उत्तर मिळणे ओघाने आलेच. ते देण्यात अर्थमंत्री निर्मला सीतारामन अजिबात कमी पडल्या नाहीत. इंडिया आघाडीचा राग घालविण्यासाठीच ममता बॅनर्जींना असे वागावे लागले, असा टोला त्यांनी लगावला. मात्र, अशा वादविवादात या आयोगाच्या हेतूला व प्रतिष्ठेलाच हरताळ फासला जातो याचे भान ना सत्ताधाऱ्यांनी ठेवले ना विरोधकांनी. स्वातंत्र्यानंतर देशाच्या सर्व भागांचा समतोल विकास हा या आयोगाचा मुख्य हेतू. मात्र, तो साध्य झाला असे म्हणण्याचे धाडस आजही करता येत नाही. दक्षिणेकडील राज्यांच्या तुलनेत आजही उत्तरेकडील राज्ये विकासाबाबत 'बिमारू'च राहिली आहेत. याची कारणे शोधून त्यावर उपाययोजना करणे हे नीती आयोग व सरकारचे काम मात्र, अर्थकारणातही राजकारणच प्राधान्याचे ठरत असल्याने नीती आयोग आपल्या मूळ उद्दिष्टांपासूनच भरकटला आहे व त्यातून देशात ठोस आर्थिक नीती ऐवजी आर्थिक अनीतीचेच वातावरण तयार झाले आहे.

शिक्षण क्षितिजावरून एक तारा निवृत्त:केंद्रप्रमुख शिवाजी भोंडवे यांची सेवापूर्ती

सरकारी सेवेच्या आरंभ दिनीच सेवा समाप्तीचा दिवस ठरलेला असतो.कारण सरकारी सेवा ही एक नियमबद्ध चौकट आहे व नियमबरहुकुम ठरलेल्या चौकटीत चाकोरीबद्ध प्रवास ही सरकारी कर्मचाऱ्याची वाट असते.वयाची अठ्ठावन्न वर्ष पूर्ण झालीनियत वयोमानानुसार सरकारी सेवेतून सेवानिवृत्त व्हावं लागतं.बीड तालुक्यातील खांडेपारगाव केंद्राचे आदर्श केंद्रप्रमुख शिवाजी भोंडवे सेवानिवृत्त झाले आहेत. शैक्षणिक क्षितिजावरील एक ज्ञानगोल शैक्षणिक व्यवस्थापनातून बाजूला होत आहे.

बीड तालुक्यात त्यांची सेवा कारकीर्द दोन वर्ष असली तरी या अल्पावधीत त्यांनी त्यांचे खांडेपारगाव केंद्र नेहमीच गुणवत्ता व शासकीय उपक्रम अंमलबजावणीत अग्रणी ठेवले.त्यांच्या या गुणी प्रशासनिक नेतृत्वाला सेवेच्या एकोणचाळीस वर्षाची अनुभवी झालर आहे.

शिवाजी भोंडवे यांचा जन्म ५ जुलै १९६६ रोजी बीड पाटोदा तालुका सीमेवरील पीठी या गावी झाला.वडील प्राथमिक शिक्षक असल्याने शिक्षणाचे बाळकडू घरातच मिळाले.भोंडवे सरांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी म्हणजे पीठी येथेच जिल्हा परिषद शाळेत झाले.गावात माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्याने आठवीनंतरच्या शिक्षणासाठी जवळच्या निरगुडी हायस्कूलमध्ये जावे लागले.पीठी ते निरगुडी सहा किमी अंतर पायी ये जा करत दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.वडील शिक्षक म्हणून नोकरीस असले तरी त्यावळचे तुटपुंजे वेतन व घरात खाणारी तोंड जास्त असल्यामुळे सायकल घेणेही शक्य झाले नाही. भोंडवे सरांच्या सर्व भावडांना उच्च शिक्षणाची संधी दिली.शिक्षणाची संधी दुरापास्त असतानाही सरांचे मोठे बंधू त्याकाळी अभियंता झाले होते.ग्रामीण भागातील एक तरूण इंजिनिअर होतोय,याचं कौतुक गावाला अन्? अप्रुप कुटुंबाला होतं पण हसत्या खेळत्या बहरत्या कुटुंबाचा बहर नियतीला पाहवला नाही.एके दिवशी दुर्दैवाने उष्माघाताने इंजिनिअर बंधुचा मृत्यू झाला अन्? सारे कुटुंबच मानसिकदृष्ट्या खचले.दुःखद घटनेमुळे डॉक्टर होण्याची मनिषा बाळगून असलेले व लहानपणापासून कुशाग्र असलेले वसंत व शिवाजी भोंडवे या भावंडांनी मग

आपल्या ईच्छेचा क्रम बदलून वसंत भोंडवे यांनी ट्रेसर कोर्स करून ट्रेसर्सची नोकरी पत्करली.दोन नंबरच्या अरूण भोंडवे यानी तर चक्क शेती करणेच निवडले.सर्वात धाकटे असलेले शिवाजी भोंडवे यांनी शिक्षकी व्यवसायात येणे पसंद केले.दहावीत उत्तम गुण असल्यामुळे लगेच डी.एड्ला निवड झाली व दोन वर्षात डी.एड्.पूर्ण करून लगेच शिक्षक म्हणून नोकरी लागली.

वडिलांच्या पाऊलावर पाऊल ठेवत शिवाजी भोंडवे १९८५ साली जन्मगावातच पीठी येथे प्राथमिक शिक्षक म्हणून रूजू झाले. ज्या शाळेत त्यांनी विद्यार्थी म्हणून प्राथमिक शिक्षणाची धडे गिरवली तिथेच ते हाती खडू घेऊन इतरांचे आयुष्य घडविण्यासाठी उभे राहिले. दहा वर्षे त्यांनी या शाळेत चोख काम केले.त्यावेळी फार कमी शिक्षक नोकरी करत करत उच्च शिक्षण घेत असत.जन्मजात हुशार असलेल्या शिवाजी भोंडवे यांनी नोकरी लागली तरी उच्च शिक्षणाची कास सोडली नाही. बी.ए.बी.एड. बहिस्थपणे पूर्ण केल्यामुळे त्यांना लगेच पदवीधर शिक्षक म्हणून मोठ्या शाळेत काम करण्याची संधी मिळाली. पीठीतली प्राथमिक शिक्षक सेवेची दहा वर्षे झाले की त्यांना रोहतवाडी व रूई धानोरा येथे दहा वर्षे प्राथमिक पदवीधर शिक्षक म्हणून काम करण्यास मिळाले. वीस वर्षाच्या नोकरीनंतर त्यांना कालबद्ध पदोन्नतीने मुख्याध्यापक होण्याची संधी मिळाली. पुन्हा ते जन्मगावीच पीठीला मुख्याध्यापक म्हणून रूजू झाले. या काळात त्यांनी आपली शाळा गुणवत्तेत नेहमीच अग्रणी ठेवली. शिष्यवृत्ती, नवोदय परीक्षा, इतर स्पर्धेत नेहमी सहभाग नोंदवला.वेळप्रसंगी यशाची चवही चाखली.चार वर्षे मुख्याध्यापक म्हणून कर्तव्य बजावल्यानंतर त्यांना पुन्हा पुढील पदोन्नती मिळाली व ते केंद्रप्रमुख म्हणून गोमळवाडा येथे नियुक्त झाले. सात वर्षे तिथे कर्तव्य करून शेवटचे दोन अडीच वर्षे त्यांनी बीड तालुक्यातील खांडेपारगाव येथे केंद्रप्रमुख म्हणून काम केले. एकूण एकोणचाळीस वर्षाच्या तीन तपपार सेवेतला त्यांनी बरोबर अर्धा काळ शिक्षक म्हणून व उर्वरित अर्धा काळ प्रशासनिक म्हणून पूर्ण केला.

केंद्रप्रमुख म्हणून काम करताना संपूर्ण केंद्र, केंद्रातील सर्व शाळांना एक कुटुंब समजून नेतृत्व केले. वृक्षारोपण, मुलींची उपस्थिती वाढ,बालविवाह प्रतिबंध,विविध प्रदर्शनी सहभाग,गुणवत्ता स्पर्धा,परसबाग उपक्रम, मुख्यमंत्री स्वच्छ व सुंदर शाळा अशा नानाविध उपक्रमात सहभागी होऊन केंद्रात गुणवत्तेची चढाओढ लावून तालुक्याचे लक्ष वेधून घेतले.

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती कुणालाच चुकत नसते,तशी ती भोंडवे सरांनाही चुकणार नाही.धडाधड सेवानिवृत्तीने आधीच केंद्रप्रमुखांच्या जागा रिक्त होत असताना भोंडवे सरांसारखा कर्म कुशल व कर्तव्य कठोर केंद्रप्रमुख सेवेतून बाजूला होणं ,खूप मोठी पोकळी निर्माण करणारं आहे.कोणत्याही प्रशिक्षणात पुढे होऊन मार्गदर्शकाची भूमिका निभावली.वाढत्या वयाचे कारण न देता तांत्रिक ज्ञान स्वीकारत तंत्रस्नेही कुशलता प्राप्त केली. पदाच्या खूर्चीवरून काम करताना एखाद्याचे मन दुखावले तरी चालेल पण शासन परिपत्रकाप्रमाणे काम व वैयक्तिक पातळीवर पुन्हा मैत्री ही कसरत त्यांना योग्य जमल्यामुळे कठोर प्रशासनिक असूनही त्यांना खूप मोठा मित्र परिवार मिळाला. सरकारी सेवा बजावताना नाव लौकिक कमावलेल्या शिवाजी भोंडवे यांना स्वप्नवत सेवापूर्तीच्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा.

:::शब्दांकन:::
कचरू चांभारे
प्रभारी केंद्रप्रमुख घाटसावळी
ता.जि.बीड.मो.९४२१३८४४३४

आष्टी येथील सिव्हिल हॉस्पिटल मधील भोंगळ कारभार थांबवा-किरण डावकर

बीड । प्रतिनिधी

सध्याच्या वातावरणामध्ये व्हायरल इन्फेक्शन सारखे डेंग्यू मलेरिया चिकनगुनिया यांसारख्या आजाराने थैमान घातले आहे. या अनुषंगाने दररोजच्या सरासरी मध्ये पेशंटची संख्या वाढतच आहे. परंतु आष्टी येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये कर्मचाऱ्यांच पेशंट कडे दुर्लक्ष केलं जात आहे याचबरोबर पेशंटला ट्रीटमेंट देण्याऐवजी बाहेरून मेडिकल आणण्याची मागणी केली जात आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये असंतोष बघायला मिळत आहे. सध्याची परिस्थिती म्हणजे सलाईन सुई आणि त्यासाठी लागणारी चिकटपट्टी सुद्धा बाहेरून घेऊन या इथपर्यंत साधी गोष्ट बाहेरून आणावे लागते. जो पेशंट किंवा त्याचे नातेवाईक बोलून आवाज उठवतात त्यालाच योग्य ती ट्रीटमेंट मिळाली जाते सिव्हील हॉस्पिटल मध्ये स्टाफ कर्मचार्याकडून पेशंटला व्यवस्थित वागणूक देल्या जात नाही. माझ्यासारखे एक तरुण शरद हनुमंत खांडवे राहणार कर्हेवडगाव तालुका आष्टी जिल्हा बीड येथे आजारी असून हे स्वतः आजारी असल्यामुळे गेले दहा दिवस झालं सिव्हील हॉस्पिटल आष्टी येथे उपचारासाठी जाऊन येऊन उपचार घेत आहेत त्यामुळे त्यांच्याबरोबर अनेक नागरिकांना बाहेरून मेडिसिन आणण्याची मागणी होत आहे असे दिसून आले. जर एखादा पेशंट किंवा नातेवाईक याच्याबद्दल कर्मचाऱ्याकडे तक्रार केली तर तुम्ही कोणाला सांगायच तर सांगा किंवा कोणाला कॉल करायचा ते करा अशी आरे रावीची भाषा इथले कर्मचारी करत आहेत. त्यामुळे डिलिव्हरीची पेशंट हे नगरला रेफर केलं जात आहे जर कोणाला आष्टी सिव्हील येथेच डिलिव्हरी करायची असेल तर त्यांनाही बाहेरून मेडिकल आणण्याची मागणी केली जात आहे. याचबरोबर पैशाची मागणी केली जाते आणि आम्ही पेशंटला जबाबदार नाही असे सांगण्यात येते त्यामुळे त्यांचे नातेवाईक त्या पेशंटला नगर येथे घेऊन जात आहेत. तसेच येथील सिव्हिल हॉस्पिटल मधल्या डॉक्टरांचे आष्टी मध्ये स्वतःचे प्रायव्हेट हॉस्पिटल असल्यामुळे ते फक्त इमर्जन्सी असेल तरच सिव्हील हॉस्पिटल ला येतात अन्यथा दुसऱ्याला बघायला सांगतात हे कुठेतरी थांबून सर्व सर्वसाधारण लोकांची गैरसोय होणं थांबले पाहिजे जर आपल्याला काही पुरावे हवे असतील तर ते ही मी देऊ शकतो असं मत सामाजिक कार्यकर्ता किरण डावकर यांनी व्यक्त केलं आहे.

शरद पवार २० ठिकाणी देणार तरूणांना संधी

बीड जिल्ह्यातील परळी, आष्टी, गेवराई मतदारसंघांचा समावेश

मुंबई । प्रतिनिधी

शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून राज्यातील २० मतदारसंघात तरुण चेहऱ्यांना संधी देण्यात येणार असल्याची माहिती आहे. त्यामध्ये, अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील दिग्गजांविरुद्ध नवे चेहरे मैदानात असणार आहेत. त्यात, अजित पवारांच्या पक्षातील मंत्र्यांविरुद्ध शरद पवारांनी दंड थोपटल्याचे दिसून येत आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील परळी, आष्टी आणि गेवराई मतदारसंघांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभेलाही राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी आणि शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना पाहायला मिळणार आहे. त्या दृष्टीने दोन्ही पक्षांनी तयारी सुरू केली असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने तीन युवा उमेदवारांच्या नावाची घोषणाही यापूर्वी केली आहे. तासगाव विधानसभा मतदारसंघासाठी रोहित पाटील तर अहमदनगरच्या अकोले मतदारसंघातून अमित भांगरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यानंतर, आता पक्ष सोडून गेलेल्या बंडखोर आमदारांविरोधात शरद पवारांनी दंड थोपटले असून, प्रमुख २० विधानसभा मतदारसंघात तरुणांना मैदानात उतरवण्यात येणार असल्याचे समजते. त्यामध्ये, धनंजय मुंडेंच्या परळी, हसन मुश्रीफ यांच्या कागल, दिलीप वळसे पाटील यांच्या आंबेगाव तर, आदिती तटकरेंच्या श्रीवर्धन मतदारसंघातून नवयुवकांना संधी देण्यात येणार आहे. त्यादृष्टीने राज्यातील २० मतदारसंघात चाचपणी सुरू करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर ४० पेक्षा जास्त आमदारांनी शरद पवारांची साथ सोडून अजित पवारांसोबत महायुतीत सहभाग घेतला. मात्र, शरद पवारांनी लोकसभा निवडणुकीत मोठ्या हिंमतीने अजित पवारांविरुद्ध लढा दिला. लोकसभेला महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत झाली. त्यामध्ये, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा केवळ १ खासदार निवडून आला. तर, शरद पवारांच्या राष्ट्रवादीने तब्बल १० पैकी ८ जागांवर विजय मिळवला. त्यामध्ये, बहुतांश नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली होती. त्यामुळे, आता लोकसभेप्रमाणेच विधानसभेलाही शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून नवयुवकांना संधी देऊन विधानसभेत पाठविण्याची पवारांची रणनीती आहे.

युवकांसाठी हे मतदारसंघ असण्याची शक्यता

१) अहेरी, २) आष्टी, ३) दिंडोरी, ४) गेवराई, ५) श्रीवर्धन, ६) हडपसर, ७) पुसद, ८) बारामती, ९) अळमनेर, उदगीर (अ.जा.), ११) इंदापूर, १२) अणुशक्ती नगर, १३) परळी, १४) कागल, १५) आंबेगाव, १६) मावळ, १७) सिन्नर, १८) तुमसर, १९) फलटण (अ.जा), २०) वडगाव शेरी.

पान १वरून...

राज्यात १ कोटी ६४ लाख

याबाबतचा शासन निर्णय राज्य सरकारने निर्गमित करून मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेस आवश्यक निधी उपलब्ध करून दिला. याचा लाभ राज्यातील सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून यासाठी सुमारे १४ हजार ७६० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी लोकसभा निवडणुकीच्या आधीच सन २०२३-२४ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना भाव पडल्याने जे आर्थिक नुकसान सहन करावे लागले, त्या मोबदल्यात कापूस व सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजारांचे अनुदान देण्याची घोषणा केली होती. अर्थसंकल्पीय अधिवेशन पूर्ण होताच या योजनेसाठी सुद्धा सुमारे ४२०० कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून याचा लाभ राज्यातील सुमारे ८३ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. यात राज्यातील सुमारे ५३ लाख ८३ हजार सोयाबीन उत्पादक (एकूण लाभ - २६१२.४८ कोटी) तर सुमारे २९ लाख ९० हजार कापूस उत्पादक शेतकरी (एकूण लाभ - १५४१ कोटी) याप्रमाणे शेतकऱ्यांना लाभाचे वितरण डीबीटीद्वारे थेट संलग्न बँक खात्यांवर करण्यात येणार आहे. यानिमित्ताने महायुती सरकारच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी दिलेला शब्द पूर्ण करून दाखवला आहे.

महाराष्ट्रात ईडी

पुरावे आणि १९.५० लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. सीबीआयने या प्रकरणात सर्व प्रथम गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यांच्या आधारे ईडीने पुढे तपास सुरू केला आहे. या कंपन्यांनी १०० कोटीचे कर्ज घेतले होते. मात्र, कर्ज मिळवण्याच्या अटीनुसार प्रकल्पासाठी ७१ कोटी रुपये दिले नाहीत, असे ईडीच्या तपासात समोर आले आहे. तसेच, कर्ज स्वरुपात घेतलेली रक्कम इतर कंपन्यांच्या खात्यात वळती करण्यात आली आहे. त्यानुसार ईडीकडून पुढील तपास केला जात आहे. दरम्यान, कंपनीच्या व्यवस्थापकाने आणि सहायक कंपन्यांनी, की एम/एस तासगांवकर कंन्स्ट्रक्शन लिमिटेड; एम/एस तासगांवकर इंडस्ट्रीज लिमिटेड आणि त्यांची सहयोगी एम/एस हायटेक इंजीनियरिंग कॉर्पोरेशन इंडिया प्रा.लि.च्या माध्यमातून कर्जाच्या रक्कमेचा मोठा हिस्सा हडप केल्याचा आरोप आहे. या फसवणुकीतून सरकारी तिजोरीचे मोठे नुकसान झाले असून त्यांनी व्यक्तिगत लाभ मिळवला आहे. याप्रकरणी, सीबीआयसह आता ईडीकडून पुढील तपासणी सुरू आहे.

रोहित पवार यांच्या कंपनीसोबत संबंध

हायटेक इंजिनीअरिंग कंपनीची सहकारी कंपनी म्हणून तासगावकर कंन्स्ट्रक्शन काम करत असल्याचा ईडीचा दावा आहे. रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो कंपनीने खरेदी केलेल्या कन्नड सहकारी साखर कारखान्याच्या लिलाव प्रक्रियेत हायटेक इंजिनीअरिंग कंपनीचे नाव आले होते. या लिलाव प्रक्रियेत रोहित पवार यांनी हायटेक इंजिनीअरिंग कंपनीची मदत घेतल्याचा संशय ईडीकडून व्यक्त करण्यात येत होता.

राज्यात दुधाचा

राज्य सरकारने दुधाच्या दरासंदर्भात येत्या चार दिवसांमध्ये ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा महामार्ग रोखत शेतकरी शेतकऱ्यांचे मेगाब्लॉक आंदोलन सुरु करतील, असा इशारा किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी दिला होता. तर दुधाला प्रति लिटर ४० रुपये हमीभाव मिळावा, या प्रमुख मागणीसाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने कोतुळ येथे धरणे आंदोलन पुकारण्यात आले. या धरणे आंदोलनाचा दरम्यान, दूध हमीभावाबद्दल ठोस आश्वासन नसल्याने आंदोलन सुरुच ठेवण्याचा निर्णय या आंदोलकांनी घेतला आहे. असे असताना राज्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखें पाटील यांनी आज हा निर्णय घेत दुध संकलन केंद्रांना शेतकऱ्यांच्या दुधाला प्रती लीटर ३० रुपये दर देणे बंधऽनकारक करण्यात आल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे आता राज्यातील दूध उत्पादन शेतकरी या निर्णयाचे स्वागत करतात की, आपल्या ४० रुपयांच्या दारावर कायम राहतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

मराठ्यांच्या मुलांना संपविण्याचे

पक्षाला मोठे करायचे आहे, असे जरांगे म्हणाले.

सरकारला दंगली घडवून आणायच्या आहेत

विरोधी पक्ष आणि सत्ताधाऱ्यांना मराठ्यांना आरक्षण मिळू द्यायचे नाही. आंदोलकांच्या माध्यमातून सरकारला भांडण लावून द्यायचे आहे. दंगली घडवून आणायच्या आहेत. जाळपोळ करून गाड्या फोडायचा यांचा डाव आहे. भाजपातील ओबीसी या आंदोलकांच्या पाठीशी उभे करणार आहेत. असा सरकारचा नवीन डाव आहे. मराठा आंदोलकांना पुढे करायचे आणि मागे ओबीसीं उभे करून मराठ्यांचे आंदोलन चिघळलं, असे दाखवून मराठा समाजाला बदनाम करायचे आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. मराठ्यांची एकजूट फोडण्यासाठी मला बदनाम करण्याचा डाव सुरु आहे. भाजपवाले माझे शत्रू नाहीत आणि हे महाविकास आघाडीवाले पाहुणे नाहीत, असे जरांगे म्हणाले.

पोस्टाच्या पार्सलद्वारे शहरात

की, जालना शहरात आदित्य राजु काटकर रा. लोधी मोहल्ला जालना व त्याचे इतर साथीदार यांनी पोस्टाद्वारे काही तलवारी मागविलेल्या असुन सदर तलवारी ३१ जुलै रोजी डिलीव्हरी साठी येणार असल्याची माहिती प्राप्त झाली. अशी माहीती मिळाल्यावर सदरची माहीती वरिष्ठांना कळवुन हेड पोस्ट ऑफीस जालना येथे सापळा लावुन अदित्य राजु काटकर, मंगेश राजु काटकर हे पार्सल सोडवुन त्यांचे ताब्यात घेवुन पोस्ट ऑफीसच्या बाहेर येत असतांना आदित्य राजु काटकर व मंगेश राजु काटकर यांना ताब्यात घेतले. आदित्य राजु काटकर व मंगेश राजु काटकर यांना अधिक विचारपुस केली असता त्याने सांगितले की, दि. १५ जुलै २०२४ रोजी आम्ही व साथीदार असे सर्वजण अमृतसर येथुन शस्त्रविक्रीचे दुकानातुन मागविलेल्या एकुण २२ तलवारी तीन वेगवेगळ्या पार्सलमध्ये आज पोस्ट ऑफीस येथे आल्या आहेत. आमच्या जवळील बॉक्स सोडुन आणखी दोन बॉक्स पोस्ट ऑफीसमध्ये आहेत. मिळालेल्या माहितीप्रमाणे पोस्ट ऑफीस येथे खात्री केली असता तेथे दोन बॉक्स मिळुन आले ते चेक केले असता त्यामध्ये तलवारी मिळुन आल्या. अश्या एकुण २२ तलवारी ४४, हजार रुपये किंमतीच्या जप्त करण्यात आलेल्या आहेत.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि शांतीलाल चव्हाण, पोउपनि राजेंद्र वाघ, चाग्रेपोउपनि संजय राऊत, भाऊराव गायके, रमेश राठोड, विजय डिक्कर, रुस्तुम जैवाळ, प्रशांत लोखंडे, सागर बावीस्कर, संभाजी तनपुरे, देविदास भोजणे, संदीप चिंचोले, सचिन राऊत, रवि जाधव, भागवत खरात, किशोर पुंगळे, धिरज भोसले, सौरभ मुळे यांनी केलेली आहे.

युपीएससी परीक्षेसाठी

आले आहे, असे सरकारने जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. खेडकर यांना एका प्रकरणात केवळ त्यांचे नावच नाही तर तिच्या पालकांचे नावदेखील बदलले. या वस्तुस्थितीमुळे त्यांच्या प्रयत्नांची संख्या शोधता येऊ शकली नाही, असे सांगत यूपीएससीने पुष्टी केली आहे की भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही याची खात्री करण्यासाठी मानक ऑपरेटिंग प्रक्रिया अधिक मजबूत केली जात आहे.

राज्यातील मोटार निर्मिती

इलेक्ट्रिक वाहनांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत असून सार्वजनिक वाहतूक यंत्रणेत देखील वाहनांचा वापर वाढवला आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग केंद्र उभारण्यासाठी आवश्यक ते बदल केले आहेत. राज्य विदेशी गुंतवणुकीत अग्रेसर असून गेल्या दोन वर्षात दावोस येथे झालेल्या ६० दशलक्ष डॉलर्सच्या करारांची ८० टक्के अंमलबजावणी झाली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. यावेळी मसाकाझु योशीमुरा यांनी देखील आपल्या मनोगतात महाराष्ट्राची निवड या प्रकल्पासाठी करण्यामागची कारणे सांगितली. भारत आणि महाराष्ट्राच्या समग्र विकासात टोयोटा देखील एक भागीदार बनू इच्छिते. देशाशी गेल्या अडीच दशकापासून आमचे संबंध असून ते या प्रकल्पाच्या अजून वाढीस लागतील असेही म्हणाले. मानसी टाटा यांनी देखील यावेळी राज्य शासनाचे या प्रकल्पासाठी सहकार्य मिळाल्याबद्दल आभार मानले. प्रारंभी प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी या प्रक्ल्पामागची भूमिका स्पष्ट केली. उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांनी सूत्रसंचालन केले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १ ऑगस्ट २०२४

कृष्णा घुलेचे सी.ए.फौंडेशन परीक्षेत यश

अंबड (प्रतिनिधी)कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयातील बारावी वाणिज्य शाखेतून उत्तीर्ण झालेला विद्यार्थी द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया च्या वतीने जून २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सीए फाउंडेशन परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार राजेश भैय्या टोपे साहेब संस्थेच्या सचिव मा.मनीषा ताई टोपे प्रशासकीय अधिकारी डॉ.बी.आर. गायकवाड सह प्रशासकीय अधिकारी श्री राहुल भालेकर यांनी कौतुक केले आहे. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.शहाजी गायकवाड यांनी कृष्णा घुले यांचा सत्कार केला व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या या सत्कार संबंधी उपस्थित उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर उबाळे वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.पांडुरंग काळे प्रा. दिलीप जाधव प्रा. अनिता वाघ प्रा. शितल पालकर डॉ.संदीप साळवे श्रीमती मंदा दोरखे प्रा. पठाडे राजेंद्र प्रा. संपत पवार प्रा कृष्णा परमेश्वर प्रा. अमोल अकोलकर प्रा. सुशीला बचाटे सर्व वाणिज्य शाखेतील शिक्षकाने संबंधित विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. आपण या परीक्षेमध्ये कसे यशस्वी झालो यासंबंधी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना कृष्णा घुले यांना मार्गदर्शन केले.

अद्यावत संगणक प्रयोगशाळा व स्वावलंबी संजीवक शेती प्रयोग राबविणार-डॉ.विवेक सावंत

पर्यावरणाचा ऱ्हास करून विकास नकोय-डॉ.विवेक मोंटेरो ; नूतन वसतीगृह इमारत, सौर विद्युत संच लोकार्पण व भव्यदिव्य पालक मेळावा संपन्न

परळी । प्रतिनिधी

ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या या बीड जिल्ह्यात बालाघाट डोंगराळ भागात मोहा येथे अद्यावत संगणक प्रयोगशाळा व स्वावलंबी संजीवक शेती यासारखे नाविन्यपूर्ण प्रयोग राबवून या भागातील जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करण्यात येईल अशी गाव्ही महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे मुख्य संवर्धक डॉ.विवेक सावंत यांनी दिली तर पर्यावरणाचा ऱ्हास करून होणारा विकास हा दीर्घकाळ विपरीत परिणाम करणारा असणार आहे असे मत शास्त्रज्ञ डॉ.विवेक मोंटेरो यांनी व्यक्त केले. परळी तालुक्यातील ग्रामीण भागात सर्वात मोठी शाळा असलेल्या महाराष्ट्र विद्यालय संकुलात उभारण्यात आलेल्या नूतन वसतीगृह इमारत, सौर विद्युत संच लोकार्पण व पालक मेळावा मंगळवार दि ३० रोजी संपन्न झाला.या कार्यक्रम प्रसंगी उद्घाटन म्हणून डॉ.विवेक सावंत, प्रमुख

मार्गदर्शक डॉ.विवेक मोंटेरो, अध्यक्षस्थानी सिटू कामगार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.डी.एल.कराड, एम.के.सी.एल चे समीर पांडे, विनायक कदम, वरिष्ठ व्यवस्थापक नितीन दातार, उप व्यवस्थापक निलेश नालात, अभियंता राहुल बोरा, सचिन राडकर आदीसह महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.सावंत म्हणाले की, बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार देशाला स्वातंत्र्य मिळुन देखील या कामगारांना शुद्ध पिण्याचे पाणी अथवा वीज मिळत नाही. ऊसतोड कामगार हे अत्यंत हालाकीचे जीवन जगतात हे प्रत्यक्ष पाहिले आहे.ऊसतोड कामगारांचे हे हाल दूर करण्यासाठी एम.के.सी.एल व भाभा रिसर्च केंद्र यांच्या प्रयत्नांतून नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करत पाणी शुद्धीकरण यंत्र व सौर ऊर्जा संच निर्माण करण्याचे प्रयत्न केले.बीड जिल्ह्यातील मोहा या अति दुर्गम भागात अद्यावत संगणक प्रयोगशाळा व स्वावलंबी संजीवक शेती यासह विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देऊन या भागातील विद्यार्थी व नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल अशी गाव्ही दिली.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले डॉ.मोंटेरो यांनी सांगितले की, संविधानानुसार केवळ मोफत व सक्तीचे शिक्षण नाही तर दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे सरकारची जबाबदारी आहे.विद्यार्थ्यांना भीतीदायक असलेल्या विषय दर्जेदार पध्दतीने कसा शिकवता येईल यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.शिक्षणाने व्यक्तीचा, परिवाराचा, समाजाचा व पर्यायी देशाचा विकास होतो मात्र आज दिसत असलेला भौतिक विकास हा पर्यावरणाचा ऱ्हास करणारा असून याचे दीर्घकालीन विपरीत परिणाम भोगावे लागणार आहेत.

या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना डॉ.कराड म्हणाले की,महाराष्ट्र शिक्षण संस्थेमुळे शिक्षण घेता आले.शिक्षणाची खरी गोदावरी ग्रामीण भागात आणायचे काम संस्थापक कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांनी केले.गुणात्मक व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देत सातत्याने काय नवीन करता येईल याचा सतत प्रयत्न संस्थेकडून करण्यात येत असतात.या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्थेचे सचिव एड.अजय बुरांडे यांनी शाळेतील भौतिक सुविधा सोबतच दर्जेदार शिक्षण देण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची उपस्थित पालकांना माहिती दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहशिक्षक गणेश कुरे तर आभार व्यक्त मुख्याध्यापक मुरलीधर बोराडे यांनी केले.

मुन्शी प्रेमचंद यांच्या साहित्यात सामाजिक वास्तवाचे चित्रण -प्रा. विनोद किर्दक

पाटोदा । प्रतिनिधी

येथील जयभवानी महाविद्यालयात दि. ३१ जुलाई रोजी मुन्शी प्रेमचंद यांची जयंती साजरी करण्यात आली प्रमुख अतिथी म्हणून अंतर्गत मूल्यमापन कक्षाचे समन्वयक प्रा. विनोद किर्दक हे उपस्थित होते. मुंशी प्रेमचंद यांच्या साहित्याचा आढावा घेत पुढे बोलतांना ते म्हणाले की,

मुन्शी प्रेमचंद यांनी त्यांच्या काळातील सामाजिक वास्तवाचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि विचारप्रवर्तक लेखनाद्वारे साहित्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी गरिबी, जातिभेद, लैंगिक असमानता आणि सामान्य माणसाचे संघर्ष

यासारख्या विषयांवर लक्ष केंद्रित केले. त्यांच्या कृतींमध्ये आयोजित विवाह, ब्रिटीश नोकरशाहीचा गैरवापर आणि सावकार आणि अधिकाऱ्यांकडून ग्रामीण शेतकऱ्यांचे शोषण या सामाजिक दुष्कृत्यांचे चित्रण आहे. प्रेमचंद जयंती साजरी केल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या विस्तृत कार्यांचा शोध घेण्याची सुवर्ण संधी मिळाली असे ही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वास कदम सर हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिन्दी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सय्यद एस आर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी मानले या कार्यक्रमास महाविद्यायातील हिन्दी प्रेमी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओबीसी आरक्षण बचाव यात्रेच्या निमित्ताने ॲड.बाळासाहेब आंबेडकर आज माजलगाव शहरात

माजलगाव । प्रतिनिधी

आरक्षण बचाव यात्रा एस सी,एस टी,ओबीसींच्या हक्काची लढाई घेऊन ड.बाळासाहेब आंबेडकर

२५ जुलैला दादर - मुंबईवरून निघाले आहेत.ही यात्रा आज दि ०१ आगस्ट रोजी माजलगाव साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयास अभिवादन,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी आलेल्या यात्रेकरूस संबोधित करणार आहेत.आरक्षण बचाव यात्रेचे काही उद्दिष्ट त्यांनी ठरवले आहेत,ओबीसीचे आरक्षण वाचले पाहिजे.एससी एसटी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट झाली पाहिजे. ओबीसी विद्यार्थ्यांना एससी एसटी प्रमाणे शिष्यवृत्ती मिळते ती जशीच्या तशी लागू झाली पाहिजे. एससी एसटी व ओबीसीला पदोन्नतीत आरक्षण मिळाले पाहिजे.शंभर ओबीसी आमदार निवडून आणणे. आणि ५५ लाख बनावट कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यात यावीत. अशा प्रकारचे उद्दिष्ट या आरक्षण बचाव यात्रेमध्ये असणार आहेत.ही यात्रा मुंबई ते संभाजीनगर अशी असणार असून संभाजीनगरला याचे समारोप होणार आहे ही यात्रा व्यवस्थित मार्गक्रमण होणेसाठी सकल ओबीसी,एनटी एसटी एससी संघटना व समाजा तर्फे आवाहन करण्यात येते की आपण आज दि ०१ ऑगस्ट गुरुवार रोजी दुपारी १२:०० वाजता माजलगाव शहरात येऊन या आरक्षण बचाव यात्रेत बहुसंख्येने सहभागी व्हावे.असे आव्हान वंचित बहुजन आघाडी माजलगाव तालुकाध्यक्ष डॉ. संजय नाकलगावकर यांनी केले आहे.

पान ६ वरून...

श्रीक्षेत्र अरणचा विकास

पहिल्यांदाच अरण याठिकाणी सावता परिषदेमुळे आले त्यातून अनेक विकास कामे मार्गी लागली. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सावता परिषदेने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन दिले आहे.भविष्यातही श्रीक्षेत्र अरण चा लढा सावता परिषद अविरतपणे सुरू ठेवणार आहे.यावेळी ह.भ.प. राधाकृष्ण जायकर, सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ राजीव काळे यांची उपस्थिती होती.मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

न्याय मागणाऱ्या

का असा सवाल स्थानिक राज्यकर्ते व प्रशासनास उपस्थित करत यापुढे जर काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांना खोट्या गुन्ह्यात गोवण्याचा प्रयत्न झाल्यास काँग्रेस जशाच तसे उत्तर देईल असा इशारा परळी विधानसभेचे निरीक्षक तथा काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे इशारा दिला आहे.

पीएम किसान योजनेसंदर्भात

कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. दरम्यान कृषी अधिकाऱ्यांनी आज थावरे यांची भेट थावरे यांनी आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती केली. दरम्यान पीएम किसान योजनेची आढावा बैठक उद्या दि.०२ ऑगस्ट शुक्रवार रोजी दुपारी २:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. यावेळी तालुका नोडल अधिकारी पीएम किसान तसेच संबंधीत अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या संदर्भात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी भाई गंगाभिषण थावरे यांना पत्राद्वारे बैठकीसंदर्भात कळविले आहे.

भाजपाने तिकीट नाकारले

प्रकल्पात मराठवाड्याचं हक्काचं ३ टीएमसी पाणी आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'एमआयडीसी' ची निर्मिती अंबाजोगाई आणि केज या ठिकाणी करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासोबतच अंबाजोगाई जिल्ह्याचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून रखडला आहे. त्याही प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी मी कटीबद्ध असल्याचे ठोंबरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

विविध प्रश्नांवर भूमिका केली स्पष्ट

केज विधानसभा निवडणुकीत भाजपाने तिकीट नाकारले तर आपण कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार ? असं पत्रकारांनी विचारले असता त्यांनी आज तरी पर्याय नसल्याचे सांगत येणाऱ्या काळात जो चांगला पर्याय असेल त्या पक्षाकडून निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले. दरम्यान, संगिता ठोंबरे यांनी मतदारसंघातील विविध प्रश्नांवर मनमोकळ्यापणाने चर्चा करून विविध प्रश्नांवर आपली भूमिका स्पष्ट केली. या पत्रकार परिषदेला मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

त्या अपघातातील मयताच्या

पुढील जिवन जगण्यासाठी या कुंटुबाला आर्थिक हातभार लागावा या एकमेव उद्देशाने माजलगांव विधानसभा मतदार संघाचे युवा नेते तथा जि.प. विद्यमान सभापती जयसिंहभैय्या सोळंके यांनी मुळे कुंटुबियाची सक्षम भेट घेत सांत्वन केले, विचारपुस करत आर्थिक मदतीचा धनादेश कुंटुबाकडे सपुर्त देखील केला आहे. नगराध्यक्ष शेषराव जगताप, यावेळी जि. प. सदस्य औदुंबर सावंत, युवा नेते आनंद काळे, तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, युवा नेते अंगद मुंडे, युवा नेते माजी सरपंच लखन महागोविंद, ग्रा. प. सदस्य वैभव मस्के, युवा नेते शहादेव शेंडगे, हनुमान शेंडगे,राहुल चिंचकर, सर्जेराव शेंडगे, इश्वर मुळे, कैलास बन्सोडे यासह आदि जण उपस्थित होते.

श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात विशाखा समितीची स्थापना

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात विशाखा समितीची स्थापना दि ३१ जुलै बुधवार रोजी झाली. यावेळी विशाखा समितीच्या सचिव श्रीमती रेश्मा आळणे यांनी मार्गदर्शक तत्त्वांची माहिती सांगितली. यावेळी माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप,शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर,उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे,विभाग प्रमुख रवींद्र खोडवे, पर्यवेक्षक सदाशिव ढगे,कमलाकर झोडगे,परमेश्वर आदमाने तसेच विशाखा समितीच्या अध्यक्षा छाया कुलकर्णी,सचिव रेश्मा आळणे,अन्य सदस्या डॉ.अंजली नितीन अकोलकर, अनुराधा रामचंद्र झरकर, कांता पार्श्वनाथ अंबुरे,मनिषा सोपानराव पवार, ड.आरती अविनाश कांडुरे , पो.कॉ.प्रभावती ज्ञानोबा ढगे,डॉ.प्रज्ञा शैलेश पाठक, इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

आष्टीतील अनाथ, मूकबधीर विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप व गोड जेवण

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

आष्टी येथील रहिवासी असलेले ड प्रसाद (नाना) जोगदंड यांनी आपला वाढदिवस इतरत्र न साजरा करता त्यांच्या मित्रपरीवाराकडून नानांच्या सामाजिक जाणीव व समाजाप्रती कर्तव्यभावना जोपासण्याच्या निर्देशाप्रमाने विशेष अनाथ,मूकबंधीर,दिव्याग व शालेय विद्यार्थाना शालेय साहित्याचे वाटप करून व गोड जेवण देऊन एक स्तूत्य उपक्रम राबवून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालयात व साईज्ञान इंग्लिश स्कूल मध्ये व निवासी अपंग विद्यालयात असलेल्या अनाथ,

ॲड प्रसाद जोगदंड यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा

मूकबंधीर,दिव्याग विद्यार्थी व इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांना वाढदिवसा निमित्ताने गरज असलेले शैक्षणिक साहित्य, पाटी, रजिस्टर, वह्या, पेन्सिल, खोडरबर, शॉपनर, आदी साहित्यांचे वाटप करून व विद्यार्थाना गोड जेवण देऊन एक स्तूत्य सामाजिक उपक्रम ॲड प्रसाद जोगदंड यांच्या मित्रपरिवाराने वाढदिवसाच्या निमित्ताने राबवला आहे. यावेळी ड प्रसाद जोगदंड यांचे आई वडील यांच्या हस्ते साहित्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रम वेळी शाळेचे मुख्याध्यापक काशिद सर व त्यांचे सहकारी कर्मचारी उपस्थित होते. शाळेच्या वतीने मुख्याध्यापक सरांनी जोगदंड साहेबांचे अभार मानले. व अशा प्रकारचा उपक्रम राबवल्याबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांचा आदर्श घेऊन इतर लोकांनी सुध्दा असा प्रकारे उपक्रम राबवावा अशी इच्छा व्यक्त केली. असा स्तूत्य उपक्रम राबवल्या बदल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.यावेळी मोठ्या संख्येने मित्रपरिवार व इतर मान्यवर, शिक्षक वृंद उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद आश्रम शाळा याची मान्यता रद्द करा व त्या शिक्षकाला फाशी द्या -पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे

पाटोदा । प्रतिनिधी

दलित विदयार्थ्यांचं हत्याकांड....

अरविंद खोपे, वय -१३ इयत्ता सातवीत शिकणारा मुलगा. उराशी स्वप्न बाळगून आई वडिलांनी त्याला लातुर ला शिक्षणासाठी आश्रम शाळेत पाठविले, स्वामी विवेकानंद आश्रम शाळा,आपला मुलगा मोठा होऊन गरिबी दुर करेल हे स्वप्न आई वडिलांचे होते. आईवडील मिळल ते काम करून उपाजीविका भागवीत आहे. वडील मुंबई मध्ये कामासाठी माझा अरविंद मोठा होऊन, घराण्याच नाव उज्वल करेल या स्वप्नात वावरत होते.

आश्रम शाळेत अरविंद ची परीक्षा आहे म्हणुन आई वडिलांनी पांगरी(परळी, जि-बीड)येथून अरविंद ला आश्रम शाळेत लातुर ला सोडले, काल दिनांक २९/०७/२०२४ रोजी अरविंद च्या आई वडिलांना शिक्षकांनी अरविंद च्या आई वडिलांना फोन केला. तुमच्या अरविंद च्या पोटला काहीतरी लागलंय त्याच्या पोटातून रक्त येताय, आश्रम शाळेपासून गाव दुर असल्यामुळ नातेवाईकांना तिथं पाठवलं.तर

शिक्षकांनी सांगितलं अरविंद पळून गेला. दुपारी आई वडिलांना फोन धडाकाला अरविंद पळून गेला.अरविंद चा शोधाशोध घेत असताना आश्रम शाळेतील एका बाथरूम मध्ये मृत्यूदेह लटकट होता, सुनियोजित कट असुन,अतिशय थंडागर पद्धतीने त्याला मरून टाकान्याय आलं. आणि आज सकाळी (३०/०७/२०२४) ०३:०० वाजता त्याच आश्रम शाळेतील शिक्षक गुपचूप अरविंद चा मृत्यूदेह खाली उतरून जंगलात तो मृत्यूदेह टाकण्यासाठी निघाले असताना, अरविंद च्या नातेवाईकांनी सकाळी ०३:०० वाजता त्या शिक्षकांना रांगेहाथ पकडले. लगेच शिक्षकांनी धूम ठोकून तिथून पळ काढला.

आपल्या पोट च्या मुलाचा मृत्यूदेह पाहून आई व नातेवाईक हतबल झालेत, आई घायमोकलुन रडत होती.माझा मुलाला दवाखान्यात न्या, माझ्या मुलगा कसा परत येईल अशी आई ची धडपड चालु होती, कुठं जाऊ! काय करू? माझा मुलगा कसा पुन्हा येईल! पोटच पोरग वेगवेगळी स्वप्न, जगण्याचा आधार,माझं आयुष्य माझा राजा गेला म्हनुन आई रडत होती.वडील मुंबई वरून रात्री निघाले.

शिक्षक हा गुरु मनाला जातो, शिक्षेकानेच घात केला. हा घात जातीय भावानेतून केला अशी शंका निर्माण होत आहे. शिक्षकांने विदयार्थ्याला ठार मारलं.अरविंदला न्याय मिळाला पाहिजे, लातुर च्या पोलीस अधीक्षकांनी, लातूरचे पालकमंत्री असतील, जिल्हाधिकारी असतील यांनी लवकर भेट घटनास्थळी भेट देऊन अरविंद ला न्याय मिळुन देण्याची भूमिका घ्यावी.सकाळी ५ वाजल्यापासून ऑल इंडिया पँथर सेनेची संपूर्ण टीम आश्रम शाळेत दाखल झाली आहे. कायद्याचा धाक राहिलेला नाही, लातुर हे जातीयतेचे, गुन्हेगारांचे केंद्र होत चालेल आहे. सत्ताधाऱ्यांच्या बळावर येते अन्याय वाढत चालले आहेत. कोणत्याही परिस्थितीत आम्ही आरोपीला सोडणार नाहीत. पोलिसांनी तत्काळ छडा लावला पाहिजे अन्यथा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने महाराष्ट्रभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल. व गृहमंत्र्याच्या गाडीला आडवे झोपून न्याय मागितला जाईल.

मराठवाड्यात पावसाचा मोठा खंड? धरणे तहानलेलीच!

संभाजीनगरः राज्यात मध्य पश्चिम महाराष्ट्रात सध्या जोरदार पावसामुळे पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असताना मराठवाड्याला मात्र, अजून पावसाची प्रतिक्षाच आहे. मराठवाड्यातील बहुतांश ठिकाणी समाधानकारक पाऊस नसल्याने धरणे अजून कोरडीच असल्याचे चित्र आहे. पावसाळ्याचे दोन महिने संपले आहेत. आकडेवारीनुसार मराठवाडा विभागात ५९ टक्के पाऊस झाला आहे. मात्र नद्या आणि धरणे अजूनही कोरडीच असल्याचे चित्र आहे, त्यात ही परिस्थिती असताना पुढील २२ दिवस पावसाचा खंड राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांकडून वर्तविण्याल्याने मराठवाड्यात चिंतेची परिस्थिती आहे.

सध्या जायकवाडी प्रकल्पात अवघा ७ टक्के पाणीसाठा आहे. या धरणसाठ्यात हळूहळू वाढ होत असली तरी सिंचनासह, शेती आणि पिण्यास किती दिवस हे पाणी पुरेल याची शंका आहे. मराठवाडा विभागात ११ मोठे, ७५ मध्यम तर ७४९ लघु प्रकल्प आहेत. गोदावरी, तेरणा, मांजरा, रेणा नदीवर ४२ बंधारे आहेत. एकूण ८७७ प्रकल्पांमध्ये अवघा २० टक्क्यांपर्यंत जलसाठा आहे.उत्यामुळं लघु आणि मध्यम प्रकल्प दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. मराठवाड्यात पावसाळा सुरु झाल्यापासून ६० दिवसांत २१ दिवस पाऊस झाला आहे. पर्जन्यमापकांच्या आकड्यांनुसार विभागात ६७९.५ मि.मी.च्या तुलनेत ४०४.२ मि.मी. पाऊस झाल्याचे दिसते आहे. ५९ टक्के पावसामुळे फक्त पिकांना दिलासा मिळाला आहे, धरणांत पाणी आलेले नाही. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बीडमधील माजलगाव धरण अजूनही शुन्यावर आहे. मांजरा धरणात १.५४ टक्के पाणीसाठा शिल्लक असून हिंगोलीतील सिद्धेश्वर धरण २८.५७ टक्के तर येलदरी ३१.७१ टक्के भरले आहे. राज्याच्या तुलनेत मराठवाड्यातील पाणीसाठा अजूनही सर्वात कमी असून तो केवळ १७.५६ टक्के एवढा आहे.

नांदेड जिल्ह्यातील निम्नमनार आता ५० टक्के भरले आहे तर विष्णुपुरी ९४.२३% भरल्याने नांदेडकरांना दिलासा मिळाला आहे. धाराशिव जिल्ह्यातील निम्न तेरणात २८.४७% सीना कोरेगाव प्रकल्प अजून शून्यावरच आहे. परभणीतील निम्न दुधना प्रकल्पात केवळ ८.१४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

सोयाबीनवरील केसाळ अळीचे संपूर्ण नियंत्रण

कमीत कमी खर्चामध्ये जास्तीत जास्त उत्पादन देणारे पीक म्हणून सोयाबीन कडे पाहिले जाते. या पिकाच्या लागवड क्षेत्रात प्रतिवर्षी झपाट्याने वाढ होत असून एकूण देशातील सोयाबीन लागवडीखालील क्षेत्रापैकी जवळपास ३५ टक्के क्षेत्र एकट्या महाराष्ट्रात आहे. सोयाबीन मध्ये १८ ते २० टक्के तेलाचे आणि ३८ ते ४० टक्के प्रथिनांचे प्रमाण असते. जनावरांसाठी आणि पोल्ट्री उद्योगात देखील सोयाबीन पेंड एक पौष्टिक आहार म्हणून वापरला जातो. सोयाबीन हे पीक आंतरपीक, पीक फेरपालटीमध्ये अतिशय महत्त्वाचे पीक असून सोयाबीनच्या भरघोस उत्पादनासाठी त्याचे लागवड तंत्रज्ञान तसेच शिफारसीनुसार तण आणि किडींचा बंदोबस्त करणे देखील गरजेचे आहे. सोयाबीन वर येणाऱ्या केसाळ अळी बाबतीत सविस्तरपणे माहिती असणे गरजेचे आहे

सोयाबीन केसाळ अळीची ओळख :

ही अळी डोंगराळ व वनक्षेत्र जवळील पिकात प्रथम आक्रमण करते. नंतर इतर ठिकाणी पसरते. ही बहुभक्षी कीड असून, पूर्ण वाढलेली अळी ४० ते ४५ मिमी लांब असते. तिची दोन्ही टोके काळी व मधला भाग मळकट पिवळा असतो. तिच्या शरीरावर दाट नारिंगी केस असतात. अंड्यातून बाहेर पडलेल्या लहान अळ्या अधाशी व सामूहिकपणे पानाच्या खालील बाजूला राहून त्यातील हरितद्रव्य खातात. त्यामुळे अशी पाने जाळीदार होतात.

प्रादुर्भाव आणि नुकसान :

ही अळी केसाळ अळी स्पीलोसोमा अळी म्हणून ओळखली जाते. जी प्रामुख्याने सूर्यफूल पिकावर आढळते. यापुर्वी ही या किडीचा सोयाबीनवर प्रादुर्भाव होतं होता मात्र जास्त प्रमाणात नव्हता. त्यामुळे ही कीड काही नवीन नाही. गेल्या वर्षी मराठवाड्यात बऱ्याच भागात या किडीचा प्रादुर्भाव झाला होता. सोयाबीनचं वाढलेलं क्षेत्र, पावसाची अनियमितता आणि पेरणी ची बदललेली वेळ या सर्व कारणांमुळे सोयाबीनवर या किडीचा प्रादुर्भाव वाढताना दिसतो. मोठ्या प्रमाणात जंगलतोडीमुळे केसाळ अळ्यांना तेथे खाण्यास अत्यंत कमी झाल्यामुळे, त्यांचा प्रादुर्भाव पिकांवर दिसत आहे. यासाठी सामुहिक प्रयत्न आवश्यक असतात. या अळीचे जीवनचक्र पूर्ण झाल्यावर याचे कोष जमिनीत सुप्तावस्थेत जातात. जमिनीची खोल नांगरणी केल्यावर ते बाहेर येतात. उन्हाळ्यात प्रखर उन्हामुळे व पक्षांनी वेचून खाल्यामुळे पुढच्या पिढीच्या जीवोत्पत्ती मध्ये फरक पडतो.

नियंत्रणासाठी दीप सापळा

पावसाळ्याच्या सुरुवातीला या अळीच्या कोषामधून पतंग बाहेर येतात. दीप सापळा हा अशा पतंगांना आकर्षित करतो. या सापळ्याखाली अथवा शेतात दिवा लाऊन त्याखाली रॉकेल मिश्रित पाणी असलेले घमेले ठेवल्यास त्यात या अळीचे व इतरही पतंग पडून मरतात. शेताच्या चहूबाजूंनी पाणी साचणारा चर खणून त्यात कीटकनाशक टाकावे. त्यामुळे दुसऱ्या शेतातून येणाऱ्या लहान अळ्यांवर नियंत्रण राखता येते. ज्या शेतात यापुर्वी सुर्यफूल पीक घेतल होतं त्याठिकाणी सोयाबीन पीक घेणं टाळावं. शेताच्या कडेने सोयाबीन पेरणीच्या वेळेस सापळा पिक म्हणून सूर्यफुलाची पेरणी करावी. शेतीचे बांध स्वच्छ ठेवावेत. केसाळ अळी तसेच तंबाखूची पाने खाणारी अळी पुंजक्यामध्ये अंडी घालतात व त्यातून बाहेर पडणाऱ्या अळ्या



सुरुवातील एकाच पानावर बहुसंख्य असतात, अशी अंडी व अळ्या पाने अलगत तोडून किडी सह नष्ट करावीत. पिकांची नियमित पाहणी करून किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्यास नियंत्रणाचे उपाय योजावेत. पिकाच्याभोवती सापळा पिक म्हणून एरंडी ची एक ओळ लावावी आणि त्यावरील तंबाखूची पाने खाणारी अळी आणी केसाळ अळी यांची अंडीपुंज वेळेत नष्ट करावीत.

११. किडींनी अंडी घालू नये यासाठी सुरुवातीलाच ५% निंबोळी अर्काची फवारणी घ्यावी.

रासायनिक उपायोजना :

किडीचे रासायनिक नियंत्रण करताना क्विनॉलफॉस २५ इसी (कृश, बायोस्टेड इंडिया लिमिटेड) ३० मिली १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आणि प्रादुर्भाव जर जास्त असेल तर क्लोरएन्ट्रानिलिप्रोल १८.५ टक्के (कोराजन, एफएमसी कॉर्पोरेशन) ३ मिली किंवा इमामेक्टीन बेंजोएट १.९ टक्के ईसी (प्रोक्लेम, सिंजेंटा) किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ टक्के इसी ७ मिली या पैकी एका कीडनाशकाची प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

कपाशीवरील मर रोगाच्या प्रादुर्भावाचे व्यवस्थापन

बऱ्याच ठिकाणी कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवरच सुकू लागली तर यालाच 'आकस्मिक मर' रोग असे म्हणतात. कपाशीच्या आकस्मिक मर रोगामध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात. सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६-४८ तासात आकस्मिक मर रोगाची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात, त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते.

आकस्मिक मर रोगाचा प्रादुर्भाव दिसताच पुढील प्रमाणे व्यवस्थापन करण्याचे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रातील तज्ज्ञ यांनी केले आहे.

कपाशीवरील आकस्मिक रोगाचे व्यवस्थापन :

जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करावा. वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी. लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया + १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति

१० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी. किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी. वरील सर्व उपाय योजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्या जेणेकरून पुढे होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल.

भेंडीच्या अर्का निकिता लागवडीस अनुकूल जाती

अर्का निकिता भेंडीचा पहिला संकरित वाण आहे जो भारत आणि जगातील सार्वजनिक संस्थांनी विकसित केला आहे. ही भेंडीची संकरित जात २०१७ मध्ये संस्थेने शोधून प्रसारित केलेली आहे, जी आता खूप फायदेशीर ठरत आहे.

लवकर फुलधारणा होणाऱ्या या जातीत फुले येण्यासाठी ३९ दिवस आणि फळे येण्यासाठी ४३ दिवस लागतात. या जातीची फळे गडद हिरवी, मध्यम, गुळगुळीत आणि कोवळी असतात. या जातीत पौष्टिकदृष्ट्या जास्त अँटिऑक्सिडेंट आणि उच्च दर्ज्याचे फायबर (८.८५%) असतात. यात पोटॅशियम ३.७%, कॅल्शियम ९९७ /१०० ग्रॅम सारखे खनिजे आहेत. ही जात १२५-१३० दिवसांच्या कालावधीत तोडणीला तयार होत असून उत्पादन २१-२४ टन मिळते. अर्का निकिता ही भेंडीची जात उच्च उत्पादकता आणि शेतीसाठी अनुकूलता यासाठी ओळखली जाते. पारंपारिक शेती पद्धतींसह आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड याद्वारे या जातीचे लक्षणीय उत्पादन घेता येते. अर्का निकिता ही भेंडीची जात तिच्यातील अपवादात्मक गुणधर्मांसाठी ओळखली जाते जसे, उच्च उत्पन्न, रोग प्रतिकारशक्ती आणि विविध हंगामात आणि प्रदेशांमध्ये लागवडीस अनुकूलता.

अर्का निकीता भेंडीची प्रमुख वैशिष्ट्ये :

उच्च उत्पादन - अर्का निकिता प्रति हेक्टर २१-२४ टन इतके प्रभावी उत्पादन देते. या उच्च उत्पादकतेमुळे शेतकर्यांसाठी जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी एक चांगली निवड ठरते. फळांची गुणवत्ता - या संकरीत भेंडीची फळे गडद हिरवी, गुळगुळीत पाच कड्यांची असतात. यामुळे ही भेंडी दिसायला आकर्षक तर आहेच शिवाय काढणीस सोपी आहे. कोवळी फळे यामुळे या जातीला बाजारभाव सुद्धा चांगला मिळतो. अनुकूलता - अर्का निकिता विविध प्रकारच्या परिस्थितीत लागवडीसाठी योग्य आहे. या जातीची खरीप (पावसाळा) आणि रब्बी (हिवाळा) दोन्ही हंगामात लागवड करता येते. ही जात कर्नाटक, आंध्र प्रदेश, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, हरियाणा, महाराष्ट्र आणि अंदमान आणि निकोबार बेटांसह संपूर्ण भारतातील प्रमुख भेंडी-उत्पादक प्रदेशांसाठी अनुकूल आहे. रोग सहनशील - ही संकरित जात भेंडी पिकातील हानिकारक यलो व्हेन मोझॅक व्हायरस या रोगास सहनशील आहे. त्यामुळे पिकाच्या उत्पादनात वाढ होऊन दर्जा सुद्धा वाढतो.

वांगे पिकातील फळ पोखरणारी अळी नियंत्रन

वांग्याचे पीक घेत असताना चांगले व्यवस्थापन करूनही अपेक्षित उत्पादन भेटत नाही. उत्पादन न निघण्याचे बरीच कारणे आहेत. त्यापैकी वांगी पिकावर येणारी कीड हे प्रमुख कारण आहे. वांगी पिकातील शेंडा व फळे पोखरणारी अळीची लागण खूप मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे किडीचा धोका ओळखून वेळीच उपाययोजना केल्यास कीड नियंत्रणात येऊ शकते. वांगी पिकामध्ये येणाऱ्या शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीच्या प्रादुर्भावामुळे सर्वसाधारणपणे ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. वेळीच उपाययोजना न केल्याचे नुकसान १०० टक्क्यांपर्यंत जाऊ शकते.

वांग्यावरील शेंडा व फळे पोखरणारी अळी ही कीड अंडी, अळी, कोष व प्रौढ अशा चार अवस्थांमधून आपले जीवन पूर्ण करते. त्यापैकी अळी अवस्था आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक असते. या किडीची अळी छोटी व फिक्कट गुलाबी रंगाची असते. पतंग मध्यम आकाराचा असून पुढील पंख पांढरे व त्यावर तपकिरी रंगाचे ठिपके असतात.

जीवनक्रम :

या किडीची मादी एकानंतर एक

अशी २५० अंडी झाडाच्या पानावर, शेंड्यावर, फुलकळ्यावर आणि कोवळ्या फळांवर घालते. अंडी गोलाकार व सफेद पिवळसर रंगाची असतात. ही अंडी ३-५ दिवसांनी उबतात व त्यातून सफेद अळी बाहेर पडते. ही अळी पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेतील शेंडा व फळधारणा वेळी फळांमध्ये नुकसान करते. ही अळी १५-२० दिवसांनी प्रौढ बनून गुलाबी रंगाची दिसते, नंतर ती शेंडा अथवा फळांमधून निघून जमिनीत अथवा पालापाचोळ्यात किंवा मुळाजवळ कोषावस्थेत जाते. आठवडाभराच्या कालावधीनंतर कोषामधून प्रौढ (पतंग) बाहेर येतो. प्रौढांचे आयुष्य ६-१० दिवसांचे असते.

नुकसान :

या किडीचा प्रादुर्भाव रोप लावल्यानंतर काही आठवड्यानंतर दिसून येतो. अळी प्रथम पानाच्या देठात, कोवळ्या शेंड्यात शिरून आतील भाग खाते. या किडीचे प्रमुख लक्षण म्हणजे प्रादुर्भावग्रस्त शेंडे वाळतात. पीक फुलोऱ्यावर आल्यानंतर अळी कळी पोखरून आत शिरते, प्रादुर्भावग्रस्त फुले फळ न धरता वळून, सुकून जमिनीवर गळून पडतात. फळे आल्यानंतर ही अळी सुरवातीला छिद्र करून फळांत प्रवेश करून विष्ठेद्वारे प्रवेशद्वार बंद करते. त्यामुळे बाहेरून फळ किडल्याचे लवकर लक्षात येत नाही. आतील गर खाऊन विष्ठा आतच सोडत असल्यामुळे कीडग्रस्त फळे खाण्यास अयोग्य ठरतात.

अशा करा उपाययोजना :

उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरणी करावी, त्यामुळे किडींच्या विविध अवस्था नष्ट होतात. एकाच शेतामध्ये वर्षानुवर्षे वांग्याचे पीक घेऊ नये. जास्त प्रादुर्भाव झालेल्या शेतामध्ये पुढच्या वर्षी वांग्याचे पीक घेणे टाळावे. पिकाची योग्य प्रकारे फेरपालट करावी. मागील पिकांचे अवशेष गोळा करून नष्ट करावेत. लागवडीसाठी वांग्याच्या सुधारित व शिफारशीत वाणांचा वापर करावा. या पिकाला गरजेनुसार खतमात्रा द्यावी. आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. प्रादुर्भावग्रस्त झाडाचे शेंडे व फळे तोडून अळ्यांसहीत त्यांचा नायनाट करावा. वाणांच्या शिफारशीनुसार दोन झाडांमधील व दोन ओळींतील अंतर ठेवावे. प्रकाश सापळ्यांचा उपयोग करून पतंग नष्ट करावेत. वांगी पिकामध्ये सर्वेक्षणासाठी एकरी पाच कामगंध सापळे पिकाच्या वर एक फूट उंचीवर लावावे. शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळ्यांच्या तीव्रतेची कल्पना येईल. पाच टक्के निंबोळी अर्काची किंवा (अँझाडिरेक्टीन १० हजार पीपीएम) २.५ मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी करावी. जैविक कीड नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा व ब्रेकॉन या परोपजीवी कीटकांच्या अंड्याचे प्रसारण करावे. वरील उपाययोजना केल्यावरही शेंडा व फळे पोखरणारी अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीची पातळी पेक्षा अधिक आढळल्यास, रासायनिक नियंत्रण याचा विचार करावा.

रासायनिक नियंत्रण :

बायर सोलोमन (बीटा-साइफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड ३०० ओडी) - १५ मिली. प्रोफेक्स सुपर (प्रोफेनोफोस ४०% + सायपरमेथ्रिन ४% ईसी) - ३० मिली. बायर डेसिस १०० ईसी (डेल्टामेथ्रिन १०० ईसी) - १० मिली. डाऊ ॲग्रो सायन्स ट्रेसर (स्पिनोसॅड ४५% एससी) - ८ मिली. एफएमसी कोराजन (क्लोरॅनट्रानिलीप्रोल, १८.५%) एससी - ६ मिली.

जागतिक दिवस: लोकमान्य टिळक पुण्यतिथी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट जागतिक स्तनपान सप्ताह

महत्वाच्या घटना

१२९१ : स्वित्झर्लंड राष्ट्राची रचना.
१७७४ : जोसेफ प्रिस्टले व कार्ल शील या शास्त्रज्ञांनी ऑक्सिजन हे मूलद्रव्य वेगळे केले.
१८७६ : कोलोरॅड अमेरिकेचे ३८ वे राज्य बनले.
१९१४ : पहिले महायुद्ध जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले.
१९२० : असहकार चळवळ प्रारंभ
१९२० : महात्मा गांधी यांनी जालियनवाला बाग हत्याकांड घटनेमुळे दु:खी होऊन इंग्रज सरकारने दिलेला 'केसर ए हिंद' हा किताब वापस केला.
१९३६ : बर्लिनमध्ये अकरावे ऑलिंपिक खेळ सुरू.
१९४४ : पोलंडची राजधानी वॉर्सामधे नाझींविरुद्ध सशस्त्र उठाव झाला.
१९४७ : भारत पाकिस्तानच्या फाळणी नंतर लॉर्ड माउंटबॅटन हे भारताचे गव्हर्नर जनरल बनले तर मोहम्मद अली जिन्ना हे पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल बनले.
१९५६ : दुर्बा बॅनर्जी या इंडियन एअरलाइन्सच्या तसचं भारतातील पहिल्या महिला वैमानिक बनल्या.
१९५७ : भारतीय प्रकाशन गृह नॅशनल बुक ट्रस्ट ची स्थापना भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत एक स्वायत्त संस्था म्हणून करण्यात आली. ही संस्था मानव संसाधन विकास मंत्रालय, सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने कार्य करते.
१९५८ : आचार्य विनोबा भावे यांना रॅमन मॅग्सेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.
१९६० : इस्लामाबाद पाकिस्तानची राजधानी झाली.
१९८१ : अमेरिकेत एम.टी.व्ही. चे प्रसारण सुरु झाले.
१९९४ : भारतातील रेल्वे प्रवाशांसाठी विमा योजना लागू झाली. जगातील अशा तर्हेची ही पहिलीच योजना आहे.
१९९६ : मायकेल जॉन्सनने २०० मीटर अंतर १९.३२ सेकंदात धावून विश्वविक्रम रचला.
१९९६ : कन्नड चित्रपटसृष्टीतील अभिनेते व निर्माते डॉ. राजकुमार यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर
२००१ : सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली.
२००४ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठाची स्थापना झाली. ३ ऑगस्ट २००४ रोजी या विद्यापीठाचे औपचारिक उद्घाटन झाले.
२००८ : अकरा पर्वतारोहणांचा के या जगातील दुसरया उंच शिखरावर मृत्यू झाला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

ख्रिस्त पूर्व १०: क्लॉडियस रोमन सम्राट (मृत्यू: ख्रिस्त पूर्व ५६)
१७४४ : जीन बाप्टिस्टे लॅमार्क फ्रेंच शास्त्रज्ञ (मृत्यू: १८ डिसेंबर १८२९)
१८३५ : महादेव मोरेश्वर कुंटे कवी व संस्कृतचे प्राध्यापक. 'राजा शिवाजी' हे त्यांचे काव्य विशेष गाजले. (मृत्यू: ८ आक्टोबर १८८८ पुणे)
१८६९ : ब्रिटीश कालीन भारतातील आग्रा व अवध या संयुक्त प्रांतांचे पहिले गव्हर्नर सर स्पेन्सर हार्कोर्ट बटलर यांचा जन्मदिन.
१८८२ : पुरुषोत्तम दास टंडन स्वातंत्र्यसेनानी, भारतरत्न (१९६१), राष्ट्रभाषा हिन्दीचे समर्थक, अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष (मृत्यू: १ जुलै १९६२)
१८९९ : कमला नेहरू जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९३६)
१९१० : मोहम्मद निसार, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९१३ : भगवान आबाजी पालव ऊर्फ 'मास्टर भगवान' चित्रपट अभिनेते व दिग्दर्शक (मृत्यू: ४ फेब्रुवारी २००२)
१९१५ : श्री. ज. जोशी कथाकार व कादंबरीकार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष (मृत्यू:)
१९२० : 'लोकशाहीर' अण्णाणाऊ साठे लेखक, कवी व समाजसुधारक (मृत्यू: १८ जुलै १९६९)
१९२४ : सर फँक वॉरेल वेस्ट इंडिजचे क्रिकेटपटू (मृत्यू: १३ मार्च १९६७)
१९३२ : महजबीन बानो ऊर्फ 'मीनाकुमारी' अभिनेत्री (मृत्यू: ३१ मार्च १९७२)
१९४८ : मार्वल स्टुडिओ चे संस्थापक एव्ही अराद यांचा जन्म.
१९५२ : यजुर्वेंद्र सिंग क्रिकेटपटू
१९५५ : अरुणलाल क्रिकेटपटू व समालोचक
१९६९ : ग्रॅहॅम थॉर्प इंग्लिश क्रिकेटपटू

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११३७ : लुई (सहावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १ डिसेंबर १०८१)
१५९१ : मुघल शासक बादशाहा अकबर यांच्या दरबारातील प्रसिद्ध कवी उर्फी शीराजी यांचे निधन.
१८६३ : साली पंजाब प्रांताचे महाराज रणजीत सिंह यांची पाचवी पत्नी तथा महाराज दलीप सिंह यांची आई ज़िन्दाँ राणी यांचे निधन.
१९१३ : भारतीय हिंदी भाषेतील लोकप्रिय कादंबरीकार व लेखक देवकी नंदन खत्री यांचे निधन.
१९२० : लोकमान्य बाळ (केशव) गंगाधर टिळक समाजसुधारक आणि प्रखर राष्ट्रवादी, भगव्?दगीतेचे भाष्यकार (जन्म: २३ जुलै १८५६ रत्नागिरी)
१९९९ : निराद सी. चौधरी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते (१९७५) बंगाली/इंग्लिश लेखक. १९५१ मधे त्यांचे 'ॲन आटोबायोग्राफी ऑफ ॲन अननोन इंडियन' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. त्याच्या १४ आवृत्त्या निघाल्या. (जन्म: २३ नोव्हेंबर १८९७ किशोरगंज, म्यामेनसिंग, बांगला देश)
२००० : भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक लेखक, कवी व चित्रपट गीतकार अली सरदार जाफरी यांचे निधन.
२००५ : फहाद सौदी अरेबियाचा राजा (जन्म: १६ मार्च १९२१)
२००८ : अशोक मांकड क्रिकेटपटू (जन्म: १२ आक्टोबर १९४६)
२००८ : हरकिशन सिंग सुरजित मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते व पॉलिट ब्यूरोचे सदस्य (जन्म: २३ मार्च १९१६)

पोकळ घोषणा नको,हमीभावासह, सरसकट कर्जमाफी द्या-भाई ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

लढा उभारून शेकाप महापुरुषांना अभिवादन करणार.. माजलगाव प्रतिनिधी शासन केवळ स्टंटबाजी करत लाडकी बहीण, लाडका भाऊ यांच्यासह विविध पोकळ घोषणा करत असून शेतात राबणारा कष्टकरी, शेतकरी गेल्या दहा वर्षात शेती पिकत नाही म्हणून प्रचंड प्रमाणात आत्महत्या करत असताना शासन बघ्याची भूमिका घेत आहे, ही बाब लोकशाहीसाठी घातक असून शेतकऱ्यांनी शेतकऱ्याच्या शेतमालाला किफायतशीर हमीभाव मिळावा या मागणीसाठी शेकापच्या लाल झेंड्याखाली एकत्र येणे गरजेचे असून शासनाने केवळ पोकळ घोषणा न करता शेतकऱ्यांना हमीभावासह सरसकट कर्जमाफी द्यावी असे मत शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील

यांनी लवूळ व पात्रूड येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना केले. शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने नऊ ऑगस्ट रोजी क्रांतीदिनी उपविभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलनही करण्यात येणार आहे त्याच्या प्रमुख मागण्या कर्जमाफी झालीच पाहिजे, पिक विमा शेतकऱ्यांना तात्काळ मिळालाच पाहिजे,उसाचे गेल्या

दोन वर्षाचे राहिलेले पैसे तात्काळ शेतकऱ्यांचा खात्यात जमा झाले पाहीजे.. पि एम किसान यौजने पासुन वंचित शेतकर्यांचा या योजनेत तत्काळ समावेश करा.. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत किफायतशीर हमी भाव द्या.बि-बियाणांच्या व खतांच्या वाढत्या किमती तात्काळ कमी करा..

माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदन रस्त्याचे मुरुम-खडीकरण करा.. लोकनेते कारखान्याने शेवटच्या ११दिवसाच्या काळातील गाळप केलेल्या ऊसाचे रोकलेले बिल तात्काळ अदा करा. अशा असून सबंध महिनाभर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गावागावात जाऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जागृती करून लोकशाहीर साहित्यरत्न कॉमेड अण्णाभाऊ साठे व क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन करण्याचा संकल्प शेतकरी कामगार पक्षाने केला आहे याची सुरुवात लऊळ, पाथरूड येथून दि.३१ जुलै रोजी केली असून शेतकऱ्याची एकजूट करून पिक विमा सह कर्जमाफी पांदण रस्त्याचे कामे व शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा असणारा शेतमालाला हमीभावाचा प्रश्न शासन दरबारी लावून धरण्यात येणार आहे तसेच यावेळी बोलताना शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी शासनाच्या पोकळ घोषणाबाजीवर घनाघात केला व शासनाने पोकळ घोषणाबाजी न करता शेतकऱ्यांचा हक्काचा असणारा हमीभाव देऊन सरसकट संपूर्ण कर्जमाफी द्यावी असे आवाहन केले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा अल्पसंख्यांक जिल्हा कार्याध्यक्ष नुमानअली चाऊस यांच्यासह पात्रुड,लऊळ येथील शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते..

घनसावंगी मतदारसंघातील गरीब कुटुंबांना सतीश घाटगेंनी मिळवून दिले हक्काचे घर

जालना । प्रतिनिधी

अहिल्यादेवी होळकर योजनेतून १२५४ कुटुंबांना घरकुल मंजूर

राज्य सरकारच्या विविध महत्वकांशी योजना प्रभावीपणे घनसावंगी मतदारसंघात राबविण्याचे काम भाजपा नेते तथा समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे करत आहेत. नुकतेच राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतून घनसावंगी मतदारसंघातील खऱ्या गरीब १,२५४ कुटुंबांना सतीश घाटगे यांच्या प्रयत्नातून घरकुल मंजूर झाले असून सतीश घाटगे यांच्या हस्ते घरकुलाचे पत्र लाभार्थ्यांना वाटप करण्यास सुरवात झाली आहे.

राज्यातील भटक्या विमुक्त व फिरस्ती करून जीवन जगणाऱ्या घटकांना हक्काचे घरकुल मिळावे, यासाठी राज्य सरकारने अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत घनसावंगी, अंबड व जालना तालुक्यातील

१२५४ कुटुंबांना सतीश घाटगे यांच्या प्रयत्नातून हक्काचे घर मंजूर झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व बहुजन कल्याण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या सहकार्यातून सतीश घाटगे यांनी या गरीब कुटुंबांना घरकुल मंजूर केले आहे. घनसावंगी मतदारसंघातील गरीब कुटुंबांना मंजूर झालेल्या घरकुलाचे पत्र सतीश घाटगे यांच्या हस्ते मंगळवारी वाटप करण्यात आले. मंगळवारी भार्डी, गोंदी, तळेगाव येथे घरकुल मंजुरीचे पत्र लाभार्थ्यांना सतीश घाटगे यांच्या हस्ते देण्यात आले. मंजुरीचे पत्र मिळाल्यानंतर सर्व लाभार्थ्यांनी मोठा आनंद व्यक्त केला. घरकुल मंजूर करून दिल्याबद्दल सतीश घाटगे पाटील यांचे व राज्य सरकारचे आभार मानले.

अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतून घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना मंजुरीचे पत्र देताना सतीश घाटगे पाटील. यांनी तालुका निहाय मंजूर झालेले घरकुलजालना-४९अंबड- ५५९, घनसावंगी -६४६

जिल्ह्यात मनाई आदेश लागू

बीड । प्रतिनिधी

मराठा ओबीसी,धनगर व इतर समाजाचे विविध उपोषण, आंदोलने, सभा सद्या सुरु असून जिल्हयात राजकीय हालचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने, रास्ता रोको या सारखे आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेची शक्यता नाकारता येत नाही.तसेच आगामी कालावधीत मराठा,ओबीसी, धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहेत. कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

हा मनाई आदेश १० ऑगस्ट २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्हात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

धर्माची श्रद्धास्थळे भूमिहीन करण्याचा सरकारचा घाट-रामनाथ खोड

बीड । प्रतिनिधी

बीड देवस्थान जमीन घोटाळा गाजत असताना आणि यात मोठमोठे राजकीय खाजगीय मंडळी अडकलेली असल्याचे उघकीस आले होते त्या अनुषंगाने शासन स्तरावरून चौकशा ही चालू होत्या त्यातच सरकारने देवस्थान सार्वजनिक इनाम जमिनी वर्ग दोन वरुन वर्ग एक करण्याचा जो निर्णय घेतला आहे या निर्णयामुळे देवस्थानच्या खिदमद मास व मदत मास जमिनी खालसा करुन त्या जमिनी हस्तातरण करण्याचा मार्ग यामुळे मोकळा झाला आहे सरकारचा हा निर्णय भुमफियांना सादक आणि देवस्थानाला बादक ठरणारा असून भूमाफिया आणि यात अडकलेल्या मोठमोठ्या हस्त्यांना वाचवण्यासाठीचा सरकारचा हा निर्णय असल्याची चर्चा लोकात चालू असून या निर्णय म्हणजे अनेक धर्माची श्रद्धास्थळे भूमिहीन करणारा आणि भुमाफिया मालामाल करणाराअसल्याची भावना जण

बीड जिल्हा हा बाला घाटाच्या कुशीत वसलेला जिल्हा असून जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक मोठमोठी स्थळे देवस्थाने आहेत मुळात या जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा आहे देवस्थान जमीन घोटाळ्यात महसूल प्रशासना पासून ते राजकीय आणि बिल्डर व भुमाफिये ज्यात अडकलेले आहेत काहीवर गुन्हे दाखल आहेत काहीवर कार्यवाया झाल्या आहेत

सामान्यात निर्माण झाली आहे चर्चा

बीड जिल्ह्यातील देवस्थान इनाम जमीन घोटाळा महाराष्ट्र भर गाजला होता त्याचे पडसाद विधी मंडळात ही उमटले होते परंतु काळातराने कार्यवाही शांत झाली आणि देवस्थान जमीन घोटाळा महसूलच्या फाइलीत बंद होऊन बसला धर्मस्थळावरील प्रेम दाखवण्यासाठी शासन स्तरावरून बेकायदेशीर हस्तातरण झालेल्या देवस्थान जमिनी पूर्वत नावे घेण्यासंदर्भात २०१० पासून ते २०२० पर्यंत अनेक परिपत्रक काढण्यात आले परंतु त्या परिपत्रकानव्ये महसूल प्रशासन स्तरावरून कार्यवाही करण्यासंदर्भात कोणतेही ठोस पावले उचललेली नाहीत उलट परिपत्रक अमलात आल्यानंतर देवस्थान जमीन घोटाळ्यात वाढ झाली शासन परिपत्रक काढतं आणि प्रशासन ते धूळ खायला बंद फाईलीत ठेवतं असंच चित्र आजवरच दिसून येत आहे

बीड जिल्ह्यात अंदाजे एकूण हिंदू मुस्लिम धार्मिक स्थळांची ४० हजार एक्करावर जमीन आहे परंतु काहीचं रेकॉर्ड जिवंत आहे तर काहीचं रेकॉर्ड गायब आहे प्रत्येक ठिकाणचे महसूल रेकॉर्ड जळीत असल्याचे ज्या त्या विभागाकडून सांगितले जाते मात्र प्रत्येक्षात ज्या जमिनीचे घोटाळे तेच रेकॉर्ड गायब झालेले असते आता तर सरकारच्या या निर्णयामुळे घोटाळे बाज लोकं बेफिकीर होणार असून जिल्ह्यातले जमीन घोटाळ्यात अडकलेले सर्व घोटाळेबाज लोकांना आयतं फलितचं गवसलं आहे देशात धर्मावर मत मागितली जातात पण धर्माची स्थळे भूमिहीन केले जातात आदी काळबेन करुन जमिनी लुबाडायचे आता अधिकृत लुबाडायचे प्रकार होतील या निर्णयावर संत महंत विश्वस्त काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे

* बीड जिल्हा हा बाला घाटाच्या कुशीत वसलेला जिल्हा असून जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक मोठमोठी स्थळे देवस्थाने आहेत मुळात या जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा आहे देवस्थान जमीन घोटाळ्यात महसूल प्रशासना पासून ते राजकीय आणि बिल्डर व भुमाफिये ज्यात अडकलेले आहेत काहीवर गुन्हे दाखल आहेत काहीवर कार्यवाया झाल्या आहेत

नागरिकांसाठी आधार अद्यावतीकरणासाठी विशेष मोहीम

जालना । प्रतिनिधी

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाकडून प्राप्त निर्देशानूसार ज्या नागरिकांच्या आधार कार्डला १० वर्षे पूर्ण झाली आहेत. अशा सर्व नागरिकांसाठी आधार कार्डवरील ओळखीचा पुरावा व पत्याच्या पुरावा अद्यावत करण्यासाठी दि.१४ सप्टेंबर २०२४ पर्यात विशेष मोहिम आयोजित करण्यात आली आहे. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी आपले आधार अद्यावत करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

जालना जिल्ह्यात जवळपास ५६ आधार केंद्रे आहेत. भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या २३ फेब्रुवारी २०२३ च्या परिपत्रकानूसार माय आधार (ह ीं ीं ि : / / ूररवहररी.ींळवरळ.सींं.ळप) पोर्टलव्दारे ऑनलाईन आधार कागदपत्रे अद्यावत करण्याकरीता पुढील २ महिने १४ सप्टेंबर २०२४ पर्यंत मोफत सेवा देण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रणालीमध्ये ऑनलाईन आधार अद्यावत केल्यास नागरिकांना कोणतेही शुल्क दि. १४ सप्टेंबर २०२४ पर्यंत लागणार नाही. आधार कार्डवरील नोंद अद्यावत करण्यासाठी आपल्या जवळच्या आधार नोंदणी केंद्रावर केवळ ५० रुपये शुल्क आकारण्यात येईल. आधार क्रमांक हा व्यक्तीच्या ओळखीचा पुरावा म्हणून उदयास आला आहे. विविध सरकारी योजना आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी आधार क्रमांकाचा वापर केला जात आहे. शासनाच्या विविध योजना आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी सर्व नागरिकांनी आपले आधार वैयक्तिक तपशिलासह अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ुींळवरळ.सींं.ळप या संकेतस्थळास भेट द्यावी. असे आधार नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

फिरत्या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन

यो.शि.संस्था व नेहरू विज्ञान केंद्रांचा पुढाकार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई संचलित पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र व नेहरू विज्ञान केंद्र मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य स्वच्छता विज्ञान प्रचार व प्रसारासाठीच्या फिरत्या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.उध्दव शिंदे, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे कार्यकारी उपाध्यक्ष ऍड.जगदीश चौसाळकर,सहसचिव भीमाशंकर शेटे, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य,विभागप्रमुख, नेहरू विज्ञान केंद्राचे शिक्षक, विज्ञान विभागातील शिक्षक आदी उपस्थित होते.

या प्रदर्शनात जवळपास वीस प्रयोग ठेवण्यात आले आहेत या मध्ये वैयक्तिक स्वच्छता, गृह स्वच्छता,संतुलित आहार,अन्न व स्वयंपाक, जलपेय आणि महिलांचे आरोग्य अशा अनेक वेगवेगळ्या प्रयोगांचे दिग्दर्शन व माहिती समाविष्ट करण्यात आली आहे.हे फिरते विज्ञान प्रदर्शन ३१ जुलै ते १५ऑगस्ट २०२४ या दरम्यान पाचवी नंतरच्या शालेय विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाचा विज्ञान विषयक निराकरणासाठी

अंबाजोगाईच्या ग्रामीण भागातील घाटनांदुर, ममदापुर, मांडेखेल, मोहा, तसेच शहरातील विविध विद्यालयांनी याचा लाभ घ्यावा असे योगेश्वरी शिक्षण संस्था पदाधिकारी आणि संचालकाच्या वतीने करण्यात आले आहे.

शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा

आष्टी । प्रतिनिधी

लोक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी यानिमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठा सेवा संघ व गणेश विद्यालय आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. गणेश विद्यालय या शाळेत शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे .या स्पर्धेत प्रथम द्वितीय व तृतीय येणाऱ्या स्पर्धकांना रोख पारितोषिके ट्रॉफी, व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. तर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जातील.अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक रमेशसिंह देसुरकर यांनी दिली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजि. तानाजी जंजिरे, जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा ड. निर्मलाताई सोनवणे ,गट शिक्षणाधिकारी सुधाकररावजी यादव आदी मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे या स्पर्धेसाठी पुढील दोन विषय ठेवण्यात आले आहेत १) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य २) लोकमान्य टिळक यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शाळेचा शिक्षक वृंद मुख्याध्यापक मराठा सेवा संघाचे कार्यकारिणी पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. स्पर्धेचे उद्घाटन एक ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी साडेनऊ वाजता गणेश विद्यालय आष्टी येथे होईल. तरी या कार्यक्रमास पालक व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्पर्धेचे संयोजक ड. सीताराम पोकळे यांनी केले आहे.

घनश्याम मुंडे सेवानिवृत्त

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक तथा पर्यवेक्षक घनश्याम आप्पाराव मुंडे बुधवारी सेवानिवृत्त झाले त्यानिमित्त त्यांच्या सन्मानाचा कार्यक्रम शाळेच्या वतीने घेण्यात आला.

घनश्याम मुंडे यांनी गेल्या ३३ वर्षांपासून सिंदफणा प्रसारक मंडळाच्या विविध शाळांत ज्ञान दानाचे पवित्र कार्य केले. दिंद्रुड वडवणी व टाकरवन येथील माध्यमिक विद्यालयात सहशिक्षक म्हणून कार्य करत असताना शेकडो विद्यार्थी घडवले. बुधवारी टाकरवन येथे सेवानिवृत्ती निमित्त त्यांच्या सन्मानाचा कार्यक्रम मुख्याध्यापक दिपक राऊत

यांच्या अध्यक्षतेखाली ह.भ.प. हरिदास महाराज सोळंके, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सदाशिव शिंदे,भगवानराव मोरे, हनुमान वराट, विवेकानंद मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सेवानिवृत्ती निमित्त घनश्याम मुंडे यांचा सपत्नीक सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष शिवाजी रांजवन व सचिव प्रताप रांजवन यांनी भावी निरोगी व सदृड आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. सर्वांशी मिळत्यात जुळता स्वभाव व लाघवी स्वभावामुळे मुंडे सरांच्या सेवानिवृत्तीने शिक्षकांसह विद्यार्थ्यांना गहिवरून आले होते.

रमेश वैद्य यांनी समर्पित भावनेने सेवा दिली- डॉ. हेमंत वैद्य

आंबेजोगाई । प्रतिनिधी

दिनांक ३१ जुलै २०२४ प्रा.रमेश वैद्य यांनी २७ वर्षाच्या त्यांच्या प्रदीर्घ सेवा काळात अत्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने आपली सेवा दिली. असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले. खोलेश्वर महाविद्यालयातील संगणक विभागातील प्रा.रमेश वैद्य हे दिनांक ३१ जुलै २०२४ नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने आयोजित सेवा गौरव सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य रामभाऊ कुलकर्णी यांची उपस्थिती होती. तसेच मंचावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा मुख्याध्यापक बाबुराव आडे, उपप्राचार्य डॉ .बिभीषण फड तसेच सेवा गौरव मूर्ती .रमेश वैद्य आणि

त्यांच्या सुविद्य पत्नी मेधाताई डबीर आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना हेमंत वैद्य यांनी रमेश वैद्य यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला महाविद्यालयाने त्यांना वेळोवेळी ज्या-ज्या जबाबदाऱ्या दिल्या. त्या सर्व जबाबदाऱ्या वैद्य सरांनी सक्षमपणे पार पाडल्या. त्यांचा स्वभाव अत्यंत शांत संयमी मनमिळावू असा होता. रमेश वैद्य यांनी महाविद्यालयीन कामकाजात अतिशय ध्येयनिष्ठ आणि प्रामाणिकपणाने काम केले. विशेष म्हणजे त्यांच्या पत्नी मेधाताई डबीर यांनी देखील व्यावसायिक शिक्षण विभागात जनरल फाउंडेशन हा विषय शिकवत असताना मोलाची साथ दिली. या दोघांनाही कार्यवाह यांनी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीचे रामभाऊ कुलकर्णी यांनी रमेश वैद्य यांनी केलेल्या कामाची स्तुती केली. आणि भावी आयुष्यासाठी दोघांना शुभेच्छा दिल्या. रमेश वैद्य यांनी महाविद्यालयाने दिलेली जबाबदारी अतिशय प्रामाणिकपणे केली. कोणत्याही गोष्टीला काम करण्याला त्यांनी नकार दिला नाही. रमेश वैद्य सरांचा स्वभाव अतिशय शांत आणि संयमी आहे. त्यांनी दिलेल्या सेवा कार्याचा संस्थेला अभिमान आहे. असे विचार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. सेवा गौरव मूर्ती रमेश वैद्य यांनी आपल्या भावना व्यक्त करताना भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने मला सेवा करण्याची संधी दिली. त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी आपल्या मनोगतात त्यांच्या संपूर्ण सेवा काळातील केलेल्या कामांना उजळणी दिली. व्यवसाय शिक्षण विभागातील सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य केले. यावेळी रमेश वैद्य यांचा महाविद्यालयाच्या वतीने भेटवस्तू सरस्वती प्रतिमा शाल व संपूर्ण आहेर देऊन यथोचित सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी सीबीएससी अध्यक्ष शाळेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव चौसाळकर यांनीही त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी खोलेश्वर महाविद्यालयीन कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दत्तप्रसाद गोस्वामी आभार प्रा.गौतम गायकवाड यांनी व्यक्त केले. वैयक्तिक पद्य श्री शैलेश पुराणिक यांनी सादर केले.

१५ ऑगस्टपर्यंत महसूल दिनानिमित्त शिबिरासह उपक्रमाचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

शासनाच्या महसूल विभागातंर्गत जिल्ह्यात दि. १ ते १५ ऑगस्ट २०२४ पर्यंतच्या कालावधीत महसूल पंधरवाड्यामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील तालुका तसेच उपविभागीय स्तरावरील आयोजित केलेल्या विशेष मोहीम, कार्यक्रम, उपक्रम, शिबीरे आणि महसूल अदालती आदि महसूल विभागाशी संबंधित कामकाजाचा नागरिकांनी वेळोवेळी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ व उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांनी केले आहे.

महसूल सप्ताहात दि.१ ऑगस्ट २०२४ रोजी महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभ व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे शिबीर, दि.२ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, दि.३ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री तिर्थ दर्शन योजना, दि.४ ऑगस्ट रोजी स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, दि.५ ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी, दि.६ ऑगस्ट रोजी एक हात मदतीचा-दिव्यांगाच्या कल्याणाचा, आणि दि. ७ ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी संवाद कार्यक्रम घेवून महसूल सप्ताहाचा समारोप करण्यात येईल. तसेच दि.८ ऑगस्ट २०२४ रोजी गाव तेथे स्मशानभूमि, दि.९ ऑगस्ट रोजी फेरफार अदालत, दि.१० ऑगस्ट रोजी कमी जास्त पत्रके गाव दप्तरी नोंद घेणे, दि.११ ऑगस्ट रोजी शिवार फेरीचे आयोजन, दि.१२ ऑगस्ट रोजी युवा प्रशिक्षण, दि.१३ ऑगस्ट रोजी विविध दाखले वाटपासाठी शिबीर, दि.१४ ऑगस्ट रोजी सेवा विषयक बाबी, प्रलंबित महालेखागार यांचे परिच्छेद निकाली काढणे तसेच दि.१५ ऑगस्ट रोजी महसूल दिन पुरस्कार सोहळा आयोजित करुन महसूल सप्ताह, पंधरवाडा कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी महसूल दिन पुरस्कार सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

पंधरवाड्यात महसूल विभागाने जिल्हास्तरीय महसूली कामे वेळेत पूर्ण करुन त्यानूसार अभिलेख अद्यावत करणे, वसूलीच्या नोटीसा पाठविणे, मोजणी करणे, अपिल प्रकरणांची चौकशी करणे, इ. कामे वेळेत व वेळापत्रकानुसार करणा-या अधिकारी व कर्मचारी यांचा तसेच महसूली वसुलीचे उद्दिष्ट पार करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करणे तसेच महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्यासाठी दरवर्षी १ ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून जिल्ह्यात साजरा करण्यात येत असतो. महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या विविध शासकीय सेवा आणि इतर विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत जिल्ह्यातील नागरिकांना अधिकाधिक माहिती होण्यासाठी व त्याचा लाभ घेता यावा यासाठी, तसेच याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दींगत व्हावा यासाठी विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम दि.१ ऑगस्ट २०२४ या महसूल दिनापासून ते १५ ऑगस्ट २०२४ या महसूल सप्ताह, पंधरवाड्यामध्ये राबविण्यात येणार आहेत. असे निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

सहकाराच्या माध्यमातून समृध्दी व्हावी -आ.संदीप क्षीरसागर

'गजानन' च्या तिसऱ्या गाळप हंगामाचे रोलर पूजन

बीड । प्रतिनिधी

शेतकरी बांधवांची, सहकाराच्या माध्यमातून समृध्दी व्हावी या उद्देशाने अनेक अडचणींतून मार्ग काढत गजानन साखर सुरू केला आहे. तालुक्यासह आजुबाजूच्या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचा कारखाना उपलब्ध झाला आहे. असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी गजानन साखर कारखान्याच्या गाळप हंगामाच्या रोलर पूजनाच्या कार्यक्रमात केले.

गजानन साखर कारखान्याच्या गाळप हंगाम २०२४-२५ च्या मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम बुधवारी (दि.३१) रोजी पार पडला. मागील तीन वर्षांपूर्वी अनेक अडचणी आणि आव्हानांना मात देत आ.संदीप क्षीरसागर यांनी गजानन साखर कारखाना सुरू केला आहे. शेतकरी आणि सर्वसामान्य सभासदांच्या पाठबळावर गेल्या दोन गाळप हंगामात यशस्वीपणे ऊसाचे गाळप करून भागातील हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना झाला आहे. आता येणार्या २०२४-२५ गाळप हंगामातही जास्तीत जास्त ऊसाचे वेळेत गाळप करण्यासाठी कारखाना प्रशासन तत्पर असणार आहे. ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना हक्काचा कारखाना, आपल्या प्रयत्नांतून उपलब्ध झाल्याचे मनस्वी समाधान असल्याच्या भावना आ.क्षीरसागर यांनी व्यक्त केल्या. मिल रोलर पूजनाच्या कार्यक्रमासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह महंत अमृतदासजी जोशी महाराज, माजी आ.सय्यद सलीम तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, कारखाना प्रशासनाचे अधिकारी-कर्मचारी, पंचक्रोशीतील शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री साहेब,आपणास शिक्षण व शिक्षक लाडके नाहीत काय?

प्रा.ईश्वर मुंडे यांचा मुख्यमंत्र्यांना सवाल

बीड । प्रतिनिधी

लोकसभेला मतदारांनी आसमान दाखवल्यावर आता महाराष्ट्रात विधान सभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून कोणाची मागणी नसतांना ही विद्यमान सरकार मतदारांना भुलवण्यासाठी रोज एक नवीन योजना घोषीत करत आहे.आता लाडकी बहीन,लाडका भाऊ, लाडके वारकरी,अन्नपुर्णा अशा योजनांचा पूर येत आहे. या योजनांच्या जाहीरातीसाठी शेकडो करोडोंचा चुराडा व शासकीय कर्मचारी यांचा वापर केला जात आहे.

परंतू शिक्षण,आरोग्य या नागरिकांच्या मुलभूत अधिकारांकडे दूर्लक्ष केले जात आहे. महाराष्ट्रात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे हजारो शिक्षक अनेक वर्षे वेतना पासून वंचित आहेत.ज्यांना वेतन आहे ते टप्पा वाढीच्या खिंडीत अडकून तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. अनेक शाळेत शिक्षक व शिक्षकेतर पदे रिक्त आहेत त्यांची भरती बंद आहे.

या सर्व प्रश्नांकडे दूर्लक्ष करणाऱ्या मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांना आपणास शिक्षण व शिक्षक लाडके नाहीत काय ? असा सवाल प्रा.ईश्वर मुंडे,राज्य प्रमुख,सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल,राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष यांनी केला आहे. या सरकारला विद्यार्थी लाडके नाहीत काय? असा सवाल ही मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी शिक्षक रिक्त पदे भरती याचीकेच्या सुनावणी दरम्यान विचारला होता.

बीड येथे विविध शैक्षणिक मागण्यांसाठी विविध शिक्षक व ईतर संघटनाचे चक्री आंदोलन सुरू आहे या आंदोलनास भेट देवून प्रा.ईश्वर मुंडे बोलत होते. या वेळी शिक्षक संघटनेचे डी.जी. तांदळे,राजेश्वर कदम, दत्तात्रय चव्हाण,दिपक वडमारे, आत्माराम वाव्हळ, सतीश सोनवणे, अविनाश काजळे, गणेश गुजर,संभाजी इंगोले,हनुमान बडे,वशिष्ठ शिंदे, सचिन यादव,बाबाराम थोरात, तानाजी मोरे,नरेंद्र गंदगे,सचिन खुरणे तसेच अंशत: अनुदानीत,विना अनुदानीत शिक्षक -शिक्षिका बहू संख्येने उपस्थीत होते.

श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग देवालयात श्री.स्वामी संतोष भारती महाराज यांची पुण्यतिथी साजरी

पिंपळवंडी । पतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थानवरील श्री.गंगा भारती मठात गुरुवर्य श्री.स्वामी संतोष भारती महाराज यांची पुण्यतिथी प्रति वर्षाप्रमाणे मंगळवार दि.३० जुलै २०२४ रोजी मठाधिपती ह.भ.प.गुरुवर्य महंत स्वामी महादेवानंदजी भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या मनोभावे भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.यावेळी श्री.स्वामी संतोष भारती महाराज यांच्या मूर्तीची महंत महादेवानंद भारती महाराज, ह.भ.प.शिवानंद भारती महाराज,ह.भ.प. आश्रुबा काकडे महाराज तसेच किसन पुरी यांच्या हस्ते विधिपूर्वक पूजा करण्यात आली.याप्रसंगी भजनी मंडळ व वारकऱ्यांनी भजन सादर केले.महाआरती होऊन मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविक-भक्तांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.या कार्यक्रमाला ह.भ.प.नारायण बजबुडे महाराज,ज्ञानेश्वर सोळसकर महाराज, माजी सभापती रामकृष्ण भोंडवे,सरपंच दिलीप भराटे,मा.सरपंच ज्ञानेश्वर पवार,उद्धवशेठ पवार,भगवान काकडे, नामदेव येवले,चेअरमन मच्छिंद्र धनवडे,भागवत खरमाटे, वैजिनाथ पवार तसेच राजाभाऊ तांबे, परमेश्वर सातपुते,सितारामबुवा नेमाने, पन्हाळकर पोस्टमन,बाबासाहेब जाधव,गोकुळ राऊत,एल.बी.पवार,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,उद्धव रहाटे, भास्कर खरमाटे,कैलास पवार,जालिंदर पवार,पुजारी नंदू गुरव,आश्रु गुरव,दिनकर तांबे,पोपट पवार,अशोक तांबे,रामहरी गुळवे, दिलीप पवार सर,सदाभाऊ पोकळे, अशोक फिटर,शंकर पवार,आबाराजे पवार,सुनिल पवार,सुरेश पवार, शिवाजी पवार आदीसह परिसरातील भाविक-भक्त,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्षीरसागरांच्या कर्तुत्वामुळे बीडकरांना प्यायला पाणी नाही

उड्डाणपूल व स्लीप रोड कामाच्या श्रेयासाठी क्षीरसागरांनी रिकामी लुडबुड करू नये -राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

बीडकरांना गेली पंचवीस वर्षापासून पंधरा दिवसाला एकदा प्यायला पाणी मोठ्या मुश्किलीने मिळते. कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च झाला. तीस वर्ष सत्ता भोगूनही आज बीड करांचा पाण्याचा प्रश्न मिटला नाही. बीड शहराची बकाल अवस्था करण्याचे श्रेय सर्व क्षीरसागरांना जाते. निवडणुका डोळ्यासमोर पाहून, पुन्हा एकदा विकासाच्या नावाखाली क्षीरसागरांनी सुरु केलेली लुडबुड निष्फळ ठरेल. नागरिकांचे मुलभूत प्रश्न सोडवण्या ऐवजी उड्डाणपूल व स्लीप रोड कामाचे श्रेय घेण्यासाठी लुडबुड करू नये. असा सल्ला भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष क्षीरसागरांना दिला आहे.

भाजपा राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, आ. नमिताताई मुदंडा, आ. लक्ष्मण पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, रमेशराव आडसकर, अक्षय मुंदडा यांच्या शिष्ट मंडळाने भूपृष्ठ वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांची दिल्ली येथे दि. २०/१०/२०२१ रोजी भेट घेऊन बीड जिल्हातील नागरिकांच्या सोयीसाठी रस्ते आणि पुलांचे प्रश्न मार्गी लावावेत अशी मागणी केली होती. छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगत स्लीप रोड, बाह्य वळण रस्त्यावर उड्डाण पूल, बिंदुसरा नदीवर पूलकम बंधारा, बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी लागणारा निधी अशा विविध कामांना प्राधान्य देऊन, रस्ते विकासाची कामे मार्गी लावावेत अशी मागणी केली होती. ना. गडकरी यांनी त्यावेळी तात्काळ दखल घेऊन, रस्ते विकासाचे काम हाती घेतले होते. त्या निर्देशानुसार आज कार्यवाही सुरु असून, केवळ पंकजाताई मुंडे व प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नातून विकास कामांना गती मिळाली आहे. परंतु जसजशी विधानसभा जवळ येत आहे. क्षीरसागर कुटुंबीयांची स्वार्थी धडपड सुरू झाली. कोणी अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन फोटो काढणे तर कोणी लोकसभा प्रचारादरम्यान आलेल्या ना. गडकरी साहेबांना निवेदन देऊन, काढलेले फोटो व्हायरल करण्याची नौटंकी करत आहेत. श्रेय लाटण्याचा निष्फळ प्रयत्न करत आहेत. हाती सत्ता असताना कर्तव्याची जाण ठेवून, विकासाला प्राधान्य दिले नाही. जनतेला वाऱ्यावर सोडून सत्तेतून संपत्ती आणि संपत्तीतून सत्ता मिळवण्याचा उग्योग केला. सुजान मतदारांना क्षीरसागरांचा लबाडीचा खेळ लक्षात आला आहे. भविष्यात श्रेय लाटण्याचा रिकामा उद्योग करू नये असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

पीएम किसान योजनेसंदर्भात उद्या जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक

भाई गंगभिषण थावरे यांच्या आंदोलनाची दखल

माजलगाव । प्रतिनिधी

पीएम किसान योजनेपासून माजलगाव सह जिल्हयातील शेतकरी वंचित राहात असून कृषी विभागाकडून कसलीही उपाययोजना केली जात नसल्याने शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी माजलगावच्या कृषी कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन व रस्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. दरम्यान याची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उद्या दि.०२ऑगस्ट शुक्रवार रोजी पीएम किसान योजनेची आढावा बैठक होणार आहे. यावेळी भाई गंगाभिषण थावरे यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे.

पाच वर्षांपूर्वी जिल्ह्यात पीएम किसान योजना लागू झाली.मात्र ७० ते ८० अर्ज पडून असून माजलगाव विधानसभा मतदारसंघात २५ ते ३० हजार लाभार्थी लाभापासून वंचित आहेत.यामुळे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष भाई गंगाभिषण थावरे यांनी ७ जुलै रोजी माजलगावच्या कृषी कार्यालयाला टाळे ठोकण्याचा तसेच १५ जुलै रोजी जिल्हाधिकारी (पान ३ वर)

श्रीक्षेत्र अरणचा विकास हाच सावता परिषदेचा ध्यास-कल्याणराव आखाडे

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र अरण विकासाच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम सावता परिषदेने केले ही बाब कोणीच नाकारू शकत नाही.शेवटच्या श्वासापर्यंत श्रीक्षेत्र अरण विकासाची लढाई लढत राहणार.श्रीक्षेत्र अरणचा विकास हाच सावता परिषदेचा ध्यास असल्याचा निर्धार कल्याणराव आखाडे यांनी व्यक्त केला.

टाका ता. अंबड जि.जालना येथे संतशिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीसोहळा निमित्ताने पारंपरिक अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभी विणा पूजनासाठी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांना निमंत्रित करण्यात आले होते.प्रसंगी बोलतांना कल्याणराव आखाडे म्हणाले की,सावता परिषदेची स्थापना माळी समाजाच्या हिता- अस्मितेच्या प्रश्नांचा जागर करण्यासाठी झाली आहे.श्रीक्षेत्र अरण प्रश्नाला पहिल्यांदा सावता परिषदेने वाचा फोडली आहे.सावता परिषदेच्या माध्यमातून अनेक श्रीक्षेत्र अरण येथे सरकारला यावे लागले.सरकार पक्षातील अनेक मंत्री ◀◀ पान ३ वर

न्याय मागणाऱ्या आंदोलकांवर गुन्हे परळीचा बिहार झालाय -दत्ता कांबळे

राजेसाहेब देशमुख यांना अडकवण्याचा डाव काँग्रेस हाणून पाडणार

मजलागाव । प्रतिनिधी

परळी शहरात रविवार, ता.२८ जुलै रोजी अंबाजोगाईकडे जाणाऱ्या रस्त्यावर न्याय मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्यासह समाजातील युवक कार्यकर्त्यांनी परळी - अंबाजोगाई या मार्गावर रास्ता रोको आंदोलन केले होते. यामुळे परळी पोलिसांकडून वाहतूक कोंडी होऊन वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागला होता. हे आंदोलन विनापरवाना असल्याचे सांगत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांच्या सह आंदोलक कार्यकर्त्यांवर सूडबुद्धीनी गुन्हा दाखल करण्यात आला. आगामी काळात राजेसाहेब देशमुख हे परळी विधानसभा मतदार संघात निवडणूक लढवणार असल्याने, त्यांना विविध माध्यमातून अडकवण्याचा प्रयत्न होत असून, हा खोट्या गुन्हामध्ये राजेसाहेब देशमुख यांना अडकवण्याचा होत असणारा डाव काँग्रेस यापुढे हाणून पाडणार असून,परळी मतदार संघाचा बिहार झालाय ◀◀ पान ३ वर

भाजपाने तिकीट नाकारले तरी केज विधानसभेची निवडणूक लढवणारचं : माजी आमदार संगिता ठोंबरे

अंबाजोगाइ । प्रतिनिधी

केज मतदारसंघातील जनतेनं माझ्यावर विश्वास टाकीत त्यांची सेवा करण्याची संधी मला दिली आहे. केज मतदारसंघाच्या विकासासाठी मी निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असून यंदाच्या निवडणुकीत मी पुर्ण ताकदीने निवडणूकीला सामोरे जाणार आहे, अशी स्पष्ट भूमिका केज मतदारसंघाच्या माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी माध्यमांशी बोलताना विषद केली.

माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी अंबाजोगाईत माध्यमांशी साधला संवाद

केज विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाईत आज माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या पत्रकार परिषदेला भाजपाचे दिलीप काळे, विजयप्रकाश ठोंबरे, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाहुळे, 'भिमशक्ती' चे भिमराव सरवदे यांच्यासह आर्दीची यावेळी उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत बोलताना माजी आमदार संगिता ठोंबरे म्हणाल्या की, केज विधानसभा मतदारसंघाची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीत एक व्हिजन डोळ्यासमोर ठेवून निवडणूक लढविण्याचा निर्धार केला आहे. केज विधानसभा मतदारसंघात अजूनही विकासाची बरीच कामं प्रलंबित आहेत. त्यासोबतचं केज मतदारसंघातील जिव्हाळ्याचे प्रश्न अजूनही मार्गी लागले नाहीत. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विधानसभेची निवडणूक लढवणार आहे. निवडणूक लढताना मतदारसंघातील जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे माजी आमदार ठोंबरे यांनी सांगितले.

केज मतदारसंघातील धनेगाव येथील

त्या अपघातातील मयताच्या कुंटुबियांना युवा नेते जयसिंह सोळंके यांनी दिला मदतीचा हात

तिगांव येथे भेट घेत मदत केली सुपूर्द

वडवणी । प्रतिनिधी

तारखेला बीड येथे झालेल्या मराठा शांतात रँली करुन परत येत असलेल्या तिगांवच्या तरुणाचा घाटसावळी नजीक अपघात होऊन मृत्यू झाला होता. या कुंटुबियांची आज युवा नेते जयसिंहभैय्या सोळंके यांनी भेट घेत विचारपुस केली व मयताच्या वारसाना आर्थिक मदत केली आहे.

याबाबत आधिक माहिती अशी कि, वडवणी तालुक्यातील तिगांव येथील रहिवाशी तरुण आणि मराठा आरक्षण लढ्यतील जनसेवक व शेतकरी बाबासाहेब भिमराव मुळे या ३५ वर्षीय तरुणाचा दि.११ रोजी बीड येथील मराठा शांतता रँली संपन्न करुन परत गांवी येत आसताना घाटसावळी नजीक अपघात होऊन दुदैवी मृत्यू झाला होता. यामध्ये घरचा प्रमुखाचे अशा अपघाताने मृत्यू होणे काळजाचा ठोका चुकल्या लगत आहे. या कुंटुबाला ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पूरग्रस्तांना मदतीपेक्षा पाहणी दौऱ्यांचा स्टंटच अधिक : रोहन सुरवसे-पाटील

पुणे । प्रतिनिधी

खडकवासला धरण साखळीतून मुठा नदीत पाणी सोडल्यानंतर महापूर आल्यामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरले. संसार भिजला, वाहून गेला, जलजन्य आजाराचा धोका वाढला आहे. याकडे कोणीही गांभीर्याने न पाहता पाहणी दौऱ्याला ऊत आला आहे. त्यांच्या सोबतीला मीडिया आणि कार्यकर्त्यांची मोठी फौज असल्याने पाण्यात रात्र काढलेले बाजूला राहिले, त्यांना मदत मिळत नाही. नेतेमंडळी केवळ स्टंटबाजी करत आहेत, अशी टीका अवस्था झाल्याची तक्रार युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील(झींपश) यांनी केली.

विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सत्ताधाऱ्यांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठीचे नवनवे फंडे सुरू केले आहेत. वरुणराजाची संततधार आणि सत्ताधाऱ्यांच्या आश्वासनांची बरसात सुरू झाली आहे. शाळा-महाविद्यालये सुरू झाली आहेत, प्रवेश घेताना अनेक अडणींचा सामना करावा लागत आहे, त्याविषयी सत्ताधारी मूग गिळून गप्प बसले आहे, अशी तक्रार युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील यांनी केली. उंड्री, काळेपडळ येथील मजूर अड्ड्यावरील कष्टकरी आणि रोजगारीवरील कामगारांच्या व्यथा सुरवसे-पाटील यांनी जाणून घेतल्या.

सुरवसे-पाटील म्हणाले की, राज्यातील सत्ताधाऱ्यांकडून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केली, त्यासाठी महिला वर्गाची अर्ज भरण्यासाठी धडपड सुरू झाली आहे. दुसरीकडे शेतमालाला हमीभाव मिळत नाहीत, त्यामुळे आत्महत्या करीत आहे. हिट अँड रनसारखे प्रकार दररोज घडत आहेत. कायदा सुव्यवस्था ढासळली आहे, पोलीस यंत्रणेचा वचक राहिला नाही, त्यामुळे सामान्यांनी न्याय कोणाकडे मागायचा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. खडकवासला धरणातून पाणी सोडल्यानंतर मुठा नदीला पूर आला, नागरिकांच्या घरात पाणी शिरले, संसार भिजला, वाहून गेला, मुलं-बाळ रात्र रात्र पाण्यात उभी होती. त्यांना मदत करण्याऐवजी पाहणी दौरे उदंड झाले आहेत. राज्यकर्त्यांनी पाहणी करण्याऐवजी त्यांना थेट मदत करण्याची गरज आहे. मात्र, तसे न करता मीडियाला बरोबर घेऊन प्रसिद्धीचा स्टंट केला जात आहे, ही लाजीरवाणी बाब आहे. भिजलेला संसार पुन्हा सावरण्यासाठी मदतीच्या आश्वासनांचा महापूर सुरू झाला आहे. तेथील मुलांची वह्या-पुस्तके, शालेय साहित्य भिजून चिंब झाले आहे, त्याकडे कोणी पाहणार आहे की नाही, अशी विचारणा त्यांनी केली.

आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी मुदतवाढ

पुणे । प्रतिनिधी

पुणे - शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५% राखीव जागांवरील प्रवेशासाठी पाचऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या अंतर्गत बालकांच्या प्रवेशासाठी पालकांना पुरेसा अवधी मिळावा आणि अधिकाधिक विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेश व्हावा, यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रीयेस २३ ते ३१ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली होती. आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रीयेचा आढावा घेतला असता या प्रवेशासाठी मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे दिसून आले. त्यामुळे एक ते पाच ऑगस्टपर्यंत प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व क्षेत्रिय अधिकारी यांनी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रीयेसाठी देण्यात आलेली मुदतवाढ लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे शाळा प्रवेश करावेत. तसेच यापुढे मुदतवाढ दिली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, अशी अशी स्पष्ट सूचना राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली आहे.

दापोडी, बोरीपार्धीतही बिबट्याची दहशत

केडगाव । प्रतिनिधी

दौंड तालुक्यात बिबट्या आता चांगलेच हातपाय पसरू लागला आहे. प्रारंभी नदीकाठच्या ऊस क्षेत्रात आढळून येणारा बिबट्या आता दापोडी, बोरीपार्धी येथेही दिसू लागला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये काळजीचे वातावरण आहे.

बोरीपार्धीतील थोरातमळा येथील अशोक जाधव यांच्या शेळीचा बिबट्याने भर दुपारी फडशा पाडला आहे. हा प्रकार सोमवारी (ता. २९) घडला. जाधव यांनी शेळी शेतात बांधलेली होती. या शेळीचा फडशा पाडण्यात आला आहे. शेळीवर हल्ला केला तेव्हा त्या भागात सुदैवाने कोणी नव्हते. त्यानंतर रात्री शहाजी थोरात यांच्या कोंबड्याच्या खुराड्यावर त्याने हल्ला केला, मात्र खुराडा बंदिस्त असल्याने बिबट्याला काही करता आले नाही.

याबाबत वनविभागाने पंचनामा केला असून, बिबट्यापासून सावध राहण्याचा ग्रामस्थांना सल्ला दिला आहे. बोरीपार्धी ग्रामस्थांनी थोरात मळा येथे पिंजरा लावण्याची मागणी केली आहे. मागील तीन आठवड्यापूर्वी दापोडी येथील पत्रकार मानसिंग रूपनवर यांच्या घराच्या संरक्षण भिंतीवर रात्री अकरा वाजता बिबट्या ठाण मांडून बसला होता. त्यामुळे दापोडीतही भीतीचे वातावरण आहे.

कीटकनाशक पाजून शाळेच्या कारकुनाने केली बळजबरी; १४ वर्षीय मुलीचा मृत्यू, इंदापूरमधील धक्कादायक घटना

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. इंदापूरमध्ये इयत्ता नववीत शिकणाऱ्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बळजबरी करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शाळेतील कारकूनाने १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. संबंधित मुलीने या कारकूनास प्रतिकार केल्याने त्याने मुलीला कीटकनाशकाचे औषध पाजल्याचा प्रकार समोर आला आहे.

संबधित घटना रविवारी (ता. २८) इंदापूर तालुक्यात घडली होती. दरम्यान अकलूजमधील खाजगी रुग्णालयात या अल्पवयीन मुलीवर उपचार सुरू होते आणि उपचारादरम्यान आज या अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाला आहे.

रणजित जाधव असं अटक केलेल्या आरोपीचे नाव असून पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. आता मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने या आरोपी विरोधात पोलिसांकडून खूनाचा गुन्हा दाखल केला जाणार आहे. पिडीत मुलीच्या फिर्यादीवरुन आरोपी रणजित जाधव याने आपल्या घरी येऊन जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रतिकार केला त्यामुळे आरोपी रणजीत जाधव याने मुलीला कीटकनाशक पाजलं अशी फिर्याद देखील पोलिसांनी दाखल केली आहे. मात्र, या मुलीच्या मृत्यूनंतर इंदापूर पोलीस आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न करतायेत का ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. कारण इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत संबंधित मुलीनं स्वतः औषध प्राशन केलं असं म्हटलं आहे. मात्र, याच मुलीच्या फिर्यादीवरून इंदापूर पोलिसांनी संबंधित आरोपीने आपल्याला औषध पाजल्याचा गुन्हा यापूर्वीच दाखल केला आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाला पोलिस आता गुंडाळण्याचा प्रयत्न करतात का? असा प्रश्न उपस्थित होत आहेत.

ठेवीदारांची फसवणूक; उदय जोशीसह सात जणांवर गुन्हा

तिघा ठेवीदारांची १८ लाख १५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी माजी नगरसेवक उदय उदय जोशी जोशी याच्यासह पत्नी, मुलगा आणि इतर अशा सात जणांविरुद्ध महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण (एमपीआयडी) अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत प्रतिभा विलास पानसे (वय ७८, रा. सुखवस्तू, शोभानगर सोसायटी, सहकारनगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी उदय जोशी, शुभदा जोशी, मयूरेश जोशी, रामलिंग शिवणगे, अशोक कुलकर्णी, वल्लभ जोशी, माजी अध्यक्ष मिथिलेश घोलप व विलास बाम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार सदाशिव पेठेतील निनाद नागरी पतसंस्थेत घडला आहे. दरम्यान, उदय जोशी आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध यापूर्वी गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पानसे गृहिणी आहेत. त्यांचे पती सेवानिवृत्त असून, पेन्शनवर कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालतो. आरोपी उदय जोशी याची निनाद नागरी सहकारी नावाची पतसंस्था आहे. पानसे आणि उदय जोशी, शुभदा जोशी, मयूर जोशी एकमेकांच्या परिचयाचे आहेत. उदय जोशी हा पतसंस्थेचा अध्यक्ष आहे. आरोपींनी पानसे यांना प्रलोभन दाखवले की, तुम्ही जर आमच्या पतसंस्थेत ठेव ठेवली तर बँकेपेक्षा जादा व्याज देऊ, तसेच ज्येष्ठांना एक टक्का जास्त व्याज देतो, असे सांगितले होते.

नवले पूलाच्या सर्व्हिस रोडने घेतला मोकळा श्वास, अतिक्रमणावर फिरला मनपाचा बुलडोझर

पुणे । प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या झोन क्र. दोन अतिक्रमण अनधिकृत बांधकाम निर्मूलन व पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम बांधकाम विभाग, सिंहगड रोड वाहतूक पोलीस विभाग व पोलीस निरीक्षक यांच्यामार्फत बुधवारी (ता. ३१) पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे व पुणे महानगरपालिका उपायुक्त माधव जगताप यांच्या आदेशानुसार नवले पूल ते सिंहगड रोड येथे संयुक्त कारवाई करण्यात आली.

पीएमआरडीए हद्दीमधील अंदाजे एक हजार चौ.फुट व पुणे मनपा हद्दीतील अंदाजे पाच हजार चौ. फुट क्षेत्र मोकळे करण्यात आले. या कारवाई करीता पीएमआरडीए मधील अनधिकृत बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता धनंजय झालटे व सिंहगड वाहतूक पोलीस विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक

राजकुमार बरडे, पुणे महानगरपालिकेचे बांधकाम विकास विभागाचे उपअभियंता विजय कुमावत, कनिष्ठ अभियंता महेश झोमन, मयूर गेडाम, इरफान शेख व विभागीय अतिक्रमण निरीक्षक नारायण साबळे, क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक उमेश नरूले, अतिक्रमण निरीक्षक अजय गोळे, सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक सागर विभुते, विठ्ठल ओमासे, मंथन आमले उपस्थित होते. या कारवाई करिता ०२ जेसीबी, ०२ ब्रेकर, ०१ गॅस कटर, ०१ बंदिस्त पिंजरा, ०२ ट्रक २० बिगारी सेवक यांचे सहाय्याने कारवाई करण्यात आली. व यापुढे पीएमआरडीए व पुणे महानगरपालिका अतिक्रमण विभाग यांचे मार्फत संयुक्त कारवाई करण्यात येणार आहे.

कारगिल विजय दिनानिमित्त ६० पोलिसांचे रक्तदान

पुणे । प्रतिनिधी

कारगिल विजय दिनाच्या (झींपश)निमित्ताने शहीद कॅप्टन सुशांत गोडबोले फाउंडेशन,रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोड व लायन्स क्लब ऑफ पुणे ट्वेन्टी फर्स्ट सेंच्युरी यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस हॉस्पिटल(शिवाजीनगर) येथे शुक्रवार (दि.२६) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यात ६० पोलिसांनी रक्तदान केले. जमा झालेले रक्त आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज (ए.एफ एम.सी.,सदर्न कमांड) ला देण्यात आले.

शिबिराला अप्पर पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपआयुक्त रोहिदास पवार, ए.सी.पी. योगेश मोरे यांनी भेट दिली. यावेळी मनोगत व्यक्त करताना अप्पर पोलीस आयुक्त अरविंद चावरिया म्हणाले ,'जवान आपल्या देशाची बाह्य सुरक्षा बघतात आणि आम्ही अंतर्गत सुरक्षा बघतो. आमच्या जवानांनाही वाटते आपणही अजून काही तरी देशासाठी करावं आणि आज आपण आम्हाला ही संधी दिलीत, त्याबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी आहोत'.

कार्यक्रमाला शहीद कॅप्टन सुशांत गोडबोले फाउंडेशनच्या अध्यक्ष्या सुवर्णा (गीता) गोडबोले, उपाध्यक्ष लायन सतीश राजहंस, खजिनदार सुजय गोडबोले, सदस्य प्रतीक भोसले, प्रशांत शितूत, सत्यजित शिंदे, रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोड तर्फे, प्रेसिडेंट पराग गाडगीळ, सेक्रेटरी देवदत्त हंबर्डीकर, प्रसाद कुंभोजकर, गिरीश ब्रह्मे, डॉ. मंजिरी हंबरडीकर आणि लायन्स क्लबचे शामा गोयल, प्रसन्न भांडारकर हे उपस्थित होते.

प्रत्येक रक्तदात्याला प्रशस्तीपत्रक, शहीद कॅप्टन सुशांत गोडबोले फाउंडेशनतर्फे एक स्टेनलेस स्टीलचा टिफिनचा डबा व रोटरी क्लब ऑफ पुणे टिळक रोड यांच्यातर्फे रेनकोट भेट देण्यात आले. हे शिबीर आयोजित करण्यासाठी पोलीस आरोग्य

समन्वयक अमोल क्षीरसागर ,पर्णल देखणे यांचे सहकार्य लाभले.

उजनी धरणातील पाणी पातळी ५० टक्के झाली

पुणे । प्रतिनिधी

पुणे, सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यासाठी जीवनदायनी ठरलेल्या उजनी धरणातील पाणीसाठा ५० टक्क्यांहून अधिक झाला आहे. उजनीवर अवलंबून असणाऱ्या सर्वांसाठी ही आनंदाची बातमी आहे. बुधवारी (दि.३१) दुपारी १२ वाजण्याच्या आकडेवारीनुसार उजनी धरण हे प्लस ५२ पूर्णांक ५८ टक्के झाले असून उजनीत एकूण ८१ पूर्णांक ८३ टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे. आता उजनी १०० टक्के भरण्यासाठी केवळ १९ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. शुक्रवारी (दि. २६) उजनी धरण मायनसमधून प्लसमध्ये आले होते. अवघ्या पाच दिवसांत उजनीत २७. ५९ टीएमसी इतका पाणीसाठा जमा झाला आहे. सध्या उजनीत दौंडहून २० हजार ८७४ क्युसेक इतका विसर्ग येत आहे.